
साप्ताहिक
शनिवार । ८ मार्च १९७५ । एक रुपया

# माणूस

चित्र वार्ता पुस्तक पुरवणीसह








विद्यार्थी
प्राध्यापकांनी
रस्त्यावर
यायलाही
हरकत नाही!
पण
कशासाठी?

# दार्मखिड प्रयोगाच्या निमित्ताने

¤ दार्मखिडच्या अनुभवावर आधारीत श्री. आबा करमरकरांचा लेख वाचला. वैचारिक विद्वत्तेपेक्षा कर्मवीराचे अनुभव सरळ भाषेत त्यांनी मांडले आहेत. त्यामुळेच लेख अधिक आवडला. अलीकडेच श्री. आबांचे अनुपस्थितीत मनोरचा प्रयोग पाहाण्याची संधी मिळाली होती. त्यांचे सहकाऱ्यांबरोबर चर्चा झाली होती. परंतु काही तपशील अपूर्ण होता. तो लेखातून समजला.

संघर्षाला विधायकाची प्रभावी जोड देणे या देशात महात्मा गांधीशिवाय दुसऱ्या कुणाला अद्याप जमलेले नाही. क्रांतीकडे नेणारा कार्यक्रम शोधण्याच्या धडपडीत अनेक आहेत. राजकीय क्षेत्रात एक प्रकारची कोंडी झाली आहे. सांसदीय निवडणुकांच्या राजकारणाचा घाणा गेली सत्तावीस वर्षे चालू आहे. निष्पन्न शून्य. कारण काँग्रेसमध्ये सर्व विरोधी पक्ष आहेत व विरोधी पक्षात 'काँग्रेसी कार्यकर्ते' आहेत. त्यामुळे खरी लढाई होतच नाही.

म्हणूनच ध्येयवादी, प्रामाणिक, प्रयोगशील धडपडींना विशेष अर्थ प्राप्त होतो. सामूहिक चिंतनातून व अशा प्रयोगातून योग्य दिशा सापडण्याची जास्त शक्यता आहे. आबांच्या 'आम्हाला येथील माणूसच समजला नाही' या विधानाशी मी सहमत आहे.

खरा भारत खेड्यात आहे. तेथे काँग्रेस-जनसंघ-समाजवादी-कम्युनिस्ट कोणाचेच 'विचार' अद्याप पोचलेले नाहीत. एक टग्या एका बाजूस तर दुसरा मातब्बर टग्या दुसऱ्या पक्षात, अशा हमखास दोन पार्ट्या असतात. इतर लोकांची राजकीय इच्छाशक्ती जागृत नाहीच. असली तर अतिक्षीण आहे. सरंजामशाही मनोवृत्ती असल्याने राजकारणाशी माझा संबंध नाही, तो धंदा–लफडे–दुसऱ्याने करावे अशीच सर्वसाधारण कल्पना आहे. रामायण-महाभारत यातील कथा–कीर्तने यातूनच आजवर ग्रामीण मनांना विचार पोचला आहे. त्यामुळे पाश्चिमात्य विचारवंतांकडून घेतलेले शब्द व संकल्पना समजतच नाहीत ही अडचण आहे. साधे वाटणारे 'समूह', 'साधनसामुग्री' हेच शब्द परके वाटतात. मग वर्ग, कामगारवर्गीय हुकूमशाही वगैरे फार दूरचे राहिले. ग्रामीण मन जाणू शकणारा; शहरी व्यवस्थापनाचे कसब शिकलेली प्रामाणिक व स्वत: जातीप्रथेपासून मुक्त झालेला युवकच हा सांधा जोडू शकेल. त्या दृष्टीने शहरात शिक्षण घेणारा ग्रामीण विद्यार्थी ह्या कामास योग्य वाटतो. फक्त तो परत खेड्यात जाऊन टिकला पाहिजे; तरच गेली ४०० वर्षे न हाललेला गावगाडा तुटेल व क्रांतीमार्गातील मोठा अडसर दूर होईल.

उत्पादक कामाबरोबर राजकीय जागृतीचे कामही त्याने करणे आवश्यक आहे. एरवी सावकारच दारूचा ठेकेदार, दुकानदार, गवताचा व्यापारीही का असतो ते त्याला समजणार नाही. अधिक कष्ट करून अधिक पैसे मिळविणे ही संकल्पना औद्योगिक क्रांतीनंतरची आहे. सरंजामशाही व्यवस्थेत कष्टाचे सर्वच फळ सावकाराच्याच घशात जाणार हे निश्चित. सामुदायिक जबाबदारीची जाणीव नसल्याचेही तेच कारण असते. एकंदर सरंजामशाही जनता आदेशवादी असते. अशा परिस्थितीत लोक उपाशी असतात तोवरच काम करतात. प्राप्ती वाढली की आळशी बनतात व गरजा वाढवतात, तेव्हा आहे हेच योग्य, अशा चुकीच्या निष्कर्षाकडे काही वळतात. त्याला उत्तर म्हणून सहकाराच्या प्रयोगात पैशांचे भागभांडवल न ठेवता श्रमांच्या मोबदल्यात नफा मिळण्याची व्यवस्था हवी.

महाभारतात मानवी मनाचे फार मनोज्ञ दर्शन आहे. परंतु रामायण अगर महाभारतात कुठेच वारसाहक्क, मालमत्तादार, मालक-मजूर असे शब्द व त्यावर चर्चा नाही. ती मार्क्सची देणगी आहे. तेव्हा माणूस समजावून घेऊन काम करावेच लागेल. परंतु परिस्थितीत परिवर्तन घडवण्याच्या दृष्टीनेच कार्य करावे लागेल. त्या दृष्टीने 'शिक्षण' या विधायक कार्यक्रमाची अधिक तपशिलाने चर्चा आबाकडून अपेक्षित आहे. संघर्षाला जोड देण्यास नवीन विधायक मार्ग शोधून काढणारा माणूस हा आजच्या युगातील गांधीच ठरणार आहे. निरनिराळ्या ठिकाणी प्रयोग करणारे क्रियाशील काही प्रकाश पाडतील काय ?

**डॉ. अरुण लिमये, पुणे**

## दार्मखिड चळवळ कोठे जाणार ?

¤ दार्मखिड येथील नव्या उपक्रमाविषयीचा आठ फेब्रुवारीच्या अंकामधील श्री. आबा करमरकरांचा लेख यापूर्वी आलेल्या लेखनाप्रमाणेच आस्थेने वाचला. तेव्हा काही चमत्कारिक गोष्टी लक्षात आल्या. त्यामुळे हे पत्र लिहावेसे वाटले. 'संबंधीत कार्यकर्ते समाजवाद मानतात का ?' असा प्रश्न निर्माण झाला.

१. 'आमचे कार्यकर्ते तेथे कशाला आले आहेत हेच मुळी त्यांना समजत नाही.' अशा प्रकारचे उल्लेख वाचताच चळवळ व चळवळीतील कार्यकर्ते आणि चळवळीतील स्थानिक लोक यांच्यात 'दुरावा' असल्याचे लक्षात येते. असा 'दुरावा' तेथील चळवळीच्या संबंधातील भौतिक परिस्थितीमुळे निर्माण झाला असला पाहिजे. त्यांची कारणमीमांसा व्यवस्थित खुलासेवार पद्धतीने विशद करावयास हवी होती.

२. '...माणसे काम करीनाशी झाली' अशी वाक्ये वाचताच एक आठवण येते. काही वर्षापूर्वी काही लोक ठराविक भोळेभाबडेपणाने भारतातील दारिद्र्याचे कारण भारतीय लोक आळशी आहेत असे सांगत. (आज असे म्हणणे धाडसाचे ठरेल). असंख्य लोकांना काम दिले जात नाही, म्हणून त्यांना काम न करण्याखेरीज गत्यंतर नसते. सध्याच्या आर्थिक चौकटीत एकीकडे दीड-दोनशे रुपड्यांसाठी दरमहा दिवसभर श्रम करणारे लोक व दुसरीकडे काम न मिळाल्यामुळे स्वस्थ बसावे लागणाऱ्यांच्या फलटणी असे चित्र आढळते. तेव्हा या चळवळीतील कार्यक्रमांचे स्वरूप सांगून कोणत्या कार्यक्रमास लोकांनी उत्साह दाखविला व कोणत्या कार्यक्रमास निरुत्साह दाखविला त्याची मुद्देसूद चर्चा झाल्याखेरीज चळवळीचे स्वरूप नीट समजणे अशक्य वाटतं.

३. आम्हाला वाटतं, ही चळवळ 'सुधारणावादी' मुळीच नसून पूर्वीच्या उत्पादनसंबंधाच्या (Relations of production) ठिकाणी नव्या प्रकारचे उत्पादनसंबंध येण्यासाठी पायवाट घालणारी या अर्थाने क्रांतिकारकच आहे.

४. भांडवलशाहीत उत्पादन अधिकाधिक सामाजिक बनत असते व नफ्यावर मात्र 'खासगी मालकी' असते. मोठ्या प्रमाणावर

मलपृष्ठ १ वर

साप्ताहिक **माणूस**

| | | | |
|---|---|---|---|
| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | ८ मार्च | अंक : एकेचाळीसावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७५ | किंमत : एक रुपया |


माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० दूरध्वनी ५७३५९





ग्राहक पंचायत उद्घाटन प्रसंगी व्यासपीठावर :

(डावीकडून) श्री. वाघ, डॉ. काळे, बिंदूमाधव जोशी, न्या. छगला, श्री. पां. वा. गाडगीळ, सूर्यकांत पाठक, ग. वा. बेहेरे, बाबुराव दौंडकर, तारा सप्रे.



रविवार दिनांक 23 फेब्रुवारीला पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिरात ग्राहक पंचायतीचे उद्घाटन झाले.


त्यानिमित्त भाषण करताना न्या. छगला म्हणाले, 'पुण्याच्या आजवरच्या कीर्तीत भर टाकणारी ही चळवळ आहे. देशभर ही पसरली पाहिजे.'

तत्पूर्वी पंचायतीचे उद्घाटन करताना पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू प्रा. देवदत्त दाभोळकर यांनी सांगितले होते : लोकशाहीची बीजे या चळवळीत आहेत. जयप्रकाशांनी महाराष्ट्रासमोर हा कार्यक्रम ठेवावा असे आपल्याला वाटते.

पंचायतीचे प्रमुख श्री. बिंदूमाधव जोशी यांनी ही चळवळ आपण कुठल्याही राजकीय पक्षाच्या वर्चस्वापासून अलिप्त ठेवू असा खुलासा केला.

छाया : प्रकाश जाधव, मोहन नावेलकर.

छायाचित्र मांडणी : सुनील कुरणे.



# पंढरपुरातील यज्ञ
## आणि
# यज्ञविरोधी निदर्शने



वैदिक यज्ञ हे एक कालविसंगत कर्मकांड आहे. म्हणून ते त्याज्य आहे.
पण निदर्शकांचा विरोध सर्व वैदिक-हिंदू संस्कृतीलाच असावा अशी शंका येते.
तसे असेल तर या यज्ञविरोधाची चिकित्सा वेगळ्या पातळीवरून होणे श्रेयस्कर आहे.




सर्वांनी 'स्वातंत्र्यवीर' सावरकरांचा
गौरव केला.
सावरकर म्हणत असत 'माझ्या स्मृतीशीलेवर
लिहा फक्त एवढीच अक्षरे'......
हिंदुसमाज संघटक

सिद्दीविनायकासमोर

# क्रांतीविनायक

बुधवार दिनांक २६ फेब्रुवारी
स्थळ ■ पुण्याचा सारसबाग चौक
सावरकरांच्या पुतळ्याच्या अनावरण प्रसंगी
भाषण करताना फिल्ड मार्शल माणेकशा





अनावरण प्रसंगी
श्री सुधीर फडके
व अन्य कलाकार यांचा
सत्कार करण्यात आला.



माणेकशा यांना स्मृतीचिन्ह भेट देताना शिवसेनेचे श्री. काका वडके आणि महापौर भाई वैद्य.

# सावरकरांच्या पुतळ्यापाशी

— द. मा. मिरासदार

सारसबागेसमोरचा विस्तीर्ण मार्ग जैन मंदिरासमोर वळलेला आहे. स्वारगेटाकडून सिंहगडाकडे जी वाट जाते त्याला मिळाला आहे. समोरून मित्रमंडळ चौकातून येणारा मार्ग तिथंच या वाटेला सामील होतो. केवढातरी प्रशस्त चौक झाला आहे. प्रशस्त आणि सुंदर. समोर छोटासा पूल आणि पर्वतीला वळसा घालून वाहणारा पाण्याचा पाट. त्यापलीकडे आभाळाच्या निळसर पार्श्वभूमीवर खुलणारी पर्वतीची टेकडी आणि तिच्यावरील मंदिरे, वर चढत गेलेल्या नागमोडी दगडीपायऱ्या, समोर हिरवीगार, डोळ्यांना सुखविणारी सारसबाग आणि आतील डौलदार सिद्धीविनायकाचे मंदिर, पाण्याची कारंजी, रंगीबेरंगी फुलझाडे, विद्युद्दीपांचा झगझगाट.

आज या चौकात लोकांची गर्दी लोटली आहे. निमंत्रित मंडळी खुर्चीवर बसत आहेत. इतर गर्दी करून उभे आहेत. चौकाच्या कोपऱ्यावरच एक लहानसे सुशोभित व्यासपीठ दिसते. त्याच्या जवळच नव्याने केलेला चौथरा आणि त्यावर उभारलेला पुतळा. पुतळ्याची जागा रंगीत कापडाने आच्छादलेली आहे. समोर दोन भीमकाय समया. सगळीकडे टापटीप. लोकांच्या झुंडीच्या झुंडी लोटत आहेत. कार्यक्रम-पत्रिकेनला रेखीवपणा कार्यक्रमस्थळीही दिसतो आहे. आज स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पुतळ्याचा अनावरण समारंभ आहे.

माझ्या मनात विचारांचे काहूर उठले आहे.

या पुण्याने सावरकरांवर फार प्रेम केले आणि सावरकरांनीही पुण्यावर मनःपूर्वक लोभ ठेवला. फर्ग्युसन महाविद्यालयातील ती विद्यार्थीदशा. तो तानाजीचा आणि बाजीप्रभूचा 'समरधीर' पवाडा. परदेशी कापडाची केलेली पहिली होळी. त्यावेळी केलेले पहिले भाषण. नंतर रत्नागिरीच्या स्थानबद्धतेतून सुटल्यावर पुणे नगरपालिकेने केलेला सत्कार. मग राजकारणाचे हिंदूकरण आणि हिंदूंचे सैनिकीकरण या मंत्राचा प्रचार करण्यासाठी स्वीकारलेले हिंदुमहासभेचे अध्यक्षपद, शनिवारवाड्यासमोर आणि टिळक स्मारक मंदिरात गाजलेली भाषणे. भागानगर सत्याग्रहाचा गदारोळ उठवण्यासाठी केलेले आवेशपूर्ण वक्तृत्व. 'देव मस्तकी धरावा । अवघा हलकल्लोळ करावा' या वृत्तीने काढलेले झंझावाती दौरे आणि त्यातील देवदुर्लभ स्वागत. स. प. महाविद्यालयाच्या क्रीडांगणवर झालेला षष्टब्दीपूर्ती भव्य सोहळा. 'मी तुमचा कसा उतराई होऊ ?... काही भावना इतक्या कोमल असतात की, त्यांना शब्दांचा स्पर्श सुद्धा सहन होत नाही—' या शब्दात सावरकरांनी व्यक्त केलेली कृतज्ञता. मध्यंतरीच्या काळातील ते राजकारणातील प्रचंड अपयश, गांधीहत्येचा आरोप आणि त्यानंतर १९५० मध्ये त्यांनीच घडवून आणलेला 'अभिनव भारताचा सांगता-समारंभ. त्यातील ते गाजलेले सिंधू-सूक्त. मग्रला दहा वर्षांचा स्वेच्छेने स्वीकारलेला एकांतवास. १९६० मध्ये अनुयायांनी घडवून आणलेला 'मृत्युंजय-दिन' याच सारसबागेच्या पटांगणावर घडून आलेला तो अखेरचा भव्य सोहळा. त्या सभेत विकलांग होऊन खुर्चीत बसलेले तात्याराव. 'मला ती भगूरची मालमत्ता आता काय करायची आहे? ती ज्याच्याकडे असेल त्याच्याकडे ती सुखेनैव राहो. मला कसलाच लोभ राहिलेला नाही. राज्यकर्त्यांच्या गळ्यातील रत्नांच्या माळा त्यांना लखलाभ असोत. माझ्या गळ्यातल्या या फुलांच्या माळा मला लखलाभ असोत!' असे उद्‌गार गहिवरून काढणारे तात्याराव. आणि अखेरीस आपणहून केलेले आत्मसमर्पण...सगळे प्रसंग डोळ्यासमोरून झरझर सरकत आहेत. माझ्या मनात अनेकविध भावनांचे कल्लोळ उठत आहेत. मुख्य पाहुणे यायला अजून वेळ आहे म्हणून मी इकडे तिकडे पाहातो. कितीतरी ओळखीची मंडळी दिसत आहेत. पुण्याचे माजी महापौर आणि सावरकरांचे एकनिष्ठ भक्त गणपतराव नलावडे, केसरीचे संपादक श्री. जयंतराव टिळक, नानासाहेब गोरे, प्रा. वि. घ. देशपांडे, 'सोबत'चे ग. वा. बेहेरे, विश्व-हिंदु परिषदेचे दादासाहेब आपटे, 'तरुण भारत'चे भिशीकर. कुणी समर्थक, कुणी विरोधक. पण आज सर्व मंडळी एकत्र आलेली दिसतात. महानगरपालिकेचे सर्व सभासद दुसऱ्या बाजूला दिसतात. ज्यांच्या परिश्रमाने हा पुतळा इथं उभारण्याचे स्वप्न साकार झाले ते जयमहाराष्ट्र मंडळाचे कार्यकर्ते आणि त्यांचे नेते काका वडके. 'माणूस'चे संपादक माजगावकर माझ्यासमोरच काका वडके यांचे अभिनंदन करतात. व्यासपीठासमोर पत्रकारांची गर्दी दिसते. बाजूला शाहीर हिंगे आणि मंडळी सावरकरांचे पोवाडे गात आहेत. पोवाड्याला लागणारा खणखणीत स्वर पुरेसा ठरत नाही. पण कदाचित तो ध्वनिक्षेपकाचाही दोष असेल. त्याजवळ गीत गाणाऱ्या आणखी काही मंडळींची पूर्वसिद्धता चालू आहे. त्यातच सुधीर फडके लगबगीने इकडे तिकडे वावरताना दिसतात. जवळच येऊन बसलेल्या त्यांच्या पत्नीला मी विचारतो,

'तुम्ही मुद्दाम या समारंभासाठी आलात मुंबईहून?'

'म्हणजे काय? आज ते स्वतः एक गीत गाणार आहेत ना या समारंभात.'

'असं? कोणतं?'

'सागरा प्राण तळमळला.'

'अरे वा!'

मला एकदम आठवण झाली. मागे केव्हातरी सुधीर फडके यांच्या घरी आमच्या गप्पागोष्टी चालल्या होत्या. 'सागरा प्राण तळ-

मळला ' हे गीत मंगेशकर बंधु-भगिनींनी म्हटलेले आहे त्याचा विषय निघाला. त्यातील काही चांगल्या गोष्टींचा उल्लेख करून बाबूजी म्हणाले, ' पण मला एक मोठी उणीव वाटते या गाण्यात. हे सामुदायिक गीत केलं आहे त्यांनी. हे ' कोरस–साँग ' कसं? वास्तविक पहाता हा सावरकरांचा एकटयाचा शोक आहे. पुरुषी आवाजात आणि एकटयानं ते म्हणणं हे जास्ती स्वाभाविक होईल. ' ' मग तुम्हीच ते का बसवित नाही ? '– मी विचारले. यावर बाबूजी हसले आणि ' आहे, केव्हातरी करायचं मनात आहे माझ्या ' अशा अर्थाने त्यांची मान हलली. तो प्रसंग एकदम आठवला. फार बरे वाटले. बाबूजी हे काव्य कसे म्हणणार आहेत याची उत्सुकता लागून राहिली.

□

ठीक सहा वाजले आणि महापौर भाई वैद्य आले. सहा वीसला मुख्य पाहुणे भारताचे माजी सरसेनानी सॅम माणेकशा यायचे होते. ते बरोबर दोनतीन मिनिटे आधी येऊन दाखल झाले. तुताऱ्या-शिंगे वाजली. टाळयांचा गजर झाला आणि लोक उत्सुकतेने उठून उभे राहून पाहू लागले. तेवढयात सर्वांनी व्यासपीठावर प्रवेश केला आणि सर्व श्रोत्यांना पाहुणे दिसायची सोय झाली. समारंभाला प्रारंभ झाला तो ' जयोऽस्तुते...' या सावरकरांच्या गाजलेल्या स्वातंत्र्यस्तोत्राने. ' आपली आवड 'मधील कलाकारांनी ते मनःपूर्वक म्हटले. आणि मग बाबूजी पेटी घेऊन व्यासपीठावर उभे राहिले. सावरकरांच्या काव्यातील आर्तता आणि मातृभूमीच्या विरहामुळे झालेले दुःख त्यांच्या स्वरास्वरातून उत्कटतेने पाझरत होते. (ध्वनिक्षेपकाच्या व्यवस्थेत मात्र काहीतरी दोष असावा. बाबुजींच्या खालच्या स्वरातील नाजूकपणा आणि कंप त्याला नीट ग्रहण करता आला नाही, असे वाटले). या गीताने समारंभाच्या वातावरणाला एका वेगळयाच गांभीर्याच्या पातळीवर नेले. आपण हलके हलके सावरकरांच्या जवळ जाऊन पोचलो आहोत, अशी एक जाणीव नकळत मनाला चाटून गेली.

(अशा प्रसंगी एखादी विसंगत गोष्ट घडली की निर्माण झालेले गांभीर्य पुष्कळदा निघून जाते. संदेश वाचनाच्या वेळी नेमके ते घडले. मुळातच हा कंटाळवाणा प्रकार. त्यात वाचणाऱ्यांनी गंमत उडवून दिल्यावर बघायलाच नको. त्यांनी अडखळत अडखळत तर संदेश वाचलेच पण शिरीष पै यांच्याऐवजी ' सुरेश पै ' असे वाचून लोकात हशाही पिकविला. ते असो.) मग शिवसेनेचे नेते श्री. काका वडके प्रास्ताविक करण्यासाठी उभे राहिले. काका वडके हे पुण्याच्या पूर्व भागातील एक तरुण आणि प्रभावी वक्ते आहेत. सावरकरांबद्दलची निष्ठा आणि जाज्वल्यता त्यांच्या नसानसात भरलेली आहे. पुण्यात सावरकरांचे स्मारक नाहो, या गोष्टीची कशी आपल्याला खत वाटत होतो हे त्यांनी सांगितले आणि ' जय महाराष्ट्र मंडळाने ' यासाठी केलेली धडपडही निवेदित केली. सावरकरांचा पुतळा उभा करायचा हे ठरल्यावर शिवसेना नेते श्री. बाळ ठाकरे यांनी दहा हजार रुपये देणगी प्रथम देऊन या कार्याला प्रारंभ केला. श्री. घैसास नावाच्या वृद्ध सावरकर-भक्तांनी घरोघर हिंडून पंधराशे रुपये जमवले. पाच–दहा पैशापासून लोकांनी पैसे दिले आणि पुतळयाचे काम पूर्ण झाले. या सर्व गोष्टी सांगून त्यांनी लोकांना धन्यवाद दिले. पुतळा तयार होऊन आणि तो महापालिकेला देऊन दोन वर्षे झाली. आज तो बसवण्याचा योग आला हे सांगताना ते म्हणाले, ' आयुष्यभर सावरकरांना बंदिवास कधी चुकला नाही. इतकंच नाही तर त्यांच्या पुतळयालाही तो चुकला नाही. दोन वर्षं हा पुतळा महापालिकेच्या बंदिवासात राहिला !...' शेवटी या सिद्धीविनायकाच्या शेजारी या क्रांति–विनायकाची स्थापना झाल्याबद्दल समाधान मानून त्यांनी आपले भाषण संपवले. या वाक्याला टाळी पडणे अपरिहार्यच होते आणि लोकांनी त्या मनापासून दिल्याही.

व्यासपीठावर मुख्य पाहुणे आणि महापौर यांच्या जोडीला स्थायी समितीचे अध्यक्ष उपमहापौर इत्यादि मंडळी होती. अगदी कडेला चष्मा लावलेले एक तरुण गृहस्थ होते. हे कोण हे कळले नाही. काका वडके यांनी त्यांचा परिचय करून दिला. ' हे वीर सावरकरांचे चिरंजीव श्री. विश्वास सावरकर ' व याहि वाक्याला लोकांनी मनःपूर्वक टाळया वाजवून त्यांच्याबद्दलची आपुलकी व्यक्त केली.

महापौर श्री. भाई वैद्य हे चांगले वक्ते आहेत. या सभेतही ते औचित्यपूर्ण असेच बोलले. पण त्यांचे भाषण जरा लांबले हे खरे. सावरकरांच्या जीवनातील अनेक घटना सांगत सांगत नंतर त्यांनी जवळ जवळ सावरकर–चरित्रच कथन केले आणि नंतर शेवटी सावरकरांच्या सामाजिक सुधारणावादाकडे ते वळले. त्यामुळे काही लांब उभी असलेली मंडळी अस्वस्थ झालेली दिसली. त्यांनी थोडा आरडाओरडा करायला प्रारंभ केला. ' वुई वाँट माणेकशा ' या घोषणाहि झाल्या. राजकारणातील माणसे नमायला कधी तयार नसतात. या घोषणांमुळे की काय पण महापौर आणखी पाच मिनिटे बोलले अशा वेळेला खरे म्हणजे लोकांनीच गांभीर्य राखले पाहिजे. त्यांचे भाषण लांबले तरी घोषणा करणे हे या प्रसंगाच्या दृष्टीने अनुचित वाटले. पण भाई वैद्यांनी सावरकर चरित्रातील महत्त्वाचे टप्पे सांगण्यात फार वेळ न घालवता, त्यांच्या सामाजिक विचारावरच भर देऊन बोलले असते तर ते बरे झाले असते, असेहि वाटले.

थोडे खटकावे असेही काही या भाषणात होते. निदान मला तरी ते थोडे खटकले. सावरकर आणि पुणे यांचे नाते सांगताना भाई म्हणाले, ' स्वातंत्र्यवीर सावरकर स्थानबद्धतेतून सुटल्यावर प्रथम पंढरपूरला गेले होते. तिथे लोकांनी त्यांना काळे झेंडे दाखवले. काळया लाह्या उधळल्या. नंतर ते पुण्याला आले. पुणेकरांनी मात्र त्यांचे अभूतपूर्व स्वागत केले...भाईंचे हे भाषण ऐकता ऐकता माझे मन किती तरी वर्षे एकदम पाठीमागे गेले. १९३७ मध्ये सावरकर स्थानबद्धतेतून सुटून पंढरपूरला आले तेव्हा मी दहा वर्षाचा शाळकरी मुलगा होतो. सावरकरांची मोठी मिरवणूक निघाली होती. तिथल्या पाटील थिएटरमधे त्यांचो जो सभा झाली तिलाही खूप गर्दी झाली होती.पन्नाशी उलटलेल्या सावरकरांची ती प्रसन्न मुद्रा, ती काळी हंगेरिअन टोपी, ती छत्री हे सगळे मला जसेच्या तसे आठवते. त्यांचे भाषण कळण्याइतका मी मोठा नव्हतो. आता काही आठवतहि नाही. पण किती तरी वेळा टाळयांचा कडकडाट झाला एवढे आठवते. चार सनातनी लोकांनी त्यांच्या मिरवणुकीत काळया

लाह्या उधळून आपला केविलवाणा निषेध प्रकट केला ही गोष्ट अगदी खरी. पण पंढरपूरला निषेध आणि पुण्याला स्वागत हे म्हणणे खरे नव्हे. मग भाई वैद्य हे का बोलले ? आज पंढरपूरला यज्ञ-विरोधी आंदोलन करण्याचा प्रयत्न समाजवादी मंडळींनी चालवला आहे; तिथल्या लोकांनी ते भल्याबुऱ्या मार्गाने हाणून पाडले असे वृत्त सगळीकडे प्रसिद्ध झाले आहे. पंढरपूरकर मंडळींवर असलेला राग तर भाईंच्या या बोलण्यातून व्यक्त झाला नाही ? एरवी ही सामान्य घटना भाईंनी या व्याख्यानात सांगितली नसती. हे खरे असेल अगर नसेल. पण मला तसे वाटले खरे.

सावरकरांचे पूर्व-चरित्र गौरवपूर्वक भाई वैद्य यांच्या मुखातून गाईले जात होते आणि मला कालमहिमा किती अगाध आहे याची प्रचीती येत होती. काँग्रेसचे नेते आणि अनुयायी आणि समाजवादी मंडळी सावरकरांच्या हयातीत नेहमीच त्यांच्यासंबंधी तुच्छतेने बोलली. सावरकरांचा गौरव त्यांनी मोकळेपणाने केला असे मला तरी आठवत नाही. फार फार तर, त्यांच्या क्रांतिकारक आयुष्या-बद्दल ते थोडे दबकून बोलत. 'आम्हाला १९१० पूर्वीचे सावरकर मान्य आहेत' असे हात राखून म्हणत. आज स्वातंत्र्य मिळून पंचवीस वर्षे उलटली. सावरकरांना जाऊन दहा वर्षे होत आली. आता कुठे त्यांचा मोठेपणा, त्यांचे कर्तृत्व, त्यांचा द्रष्टेपणा ही मंडळी थोडेफार मान्य करू लागली आहेत. काळाने वैयक्तिक द्वेषाचा विखार नाहीसा करून टाकला आहे. अर्थात हे हिंदुत्ववादी मंडळींच्या बाबतीतही घडले आहे. गांधीजींचा मनापासून राग आणि द्वेष करणारे अनेक हिंदुत्ववादीही आज गांधीजींच्या कर्तृत्वाबद्दल मनापासून आपुलकीने आणि आदराने बोलतात. कालाय तस्मै नमः हेच शेवटी खरे आहे.

¤

माजी सरसेनानी सॅम माणेकशा यांच्यासंबंधी खूप खूप ऐकले होते. वाचले होते. पण त्यांना पाहण्याचा योग आज आला. पाश्चात्य पोशाखात असलेला हा सेनानी प्रसन्नमुखाने सभाजनांकडे पहात होता. त्यांनी पुतळ्याचे अनावरण केले. दोरी खेचल्यावर पुतळ्या-भोवती असलेले कापडी आच्छादन गळून पडले आणि हात उगारलेला पूर्णाकृती पुतळा प्रकट झाला. तुतान्या शिंगे वाजत राहिली. छाया-चित्रकारांचे दिवे पटापट चमकत राहिले आणि प्रचंड टाळ्यांचा गजर सभास्थानी दुमदुमत राहिला.

आपल्या विनोदबुद्धीची चुणूक माणेकशांनी भाषणाच्या प्रारंभीच दाखविली. नंतर व्यासपीठावर येऊन हिंदीत भाषण सुरू करताना त्यांनी (अपेक्षेनुसार) मराठी येत नसल्याबद्दल श्रोत्यांची क्षमा मागितली. ते म्हणाले, 'सैन्यात असताना मी पुष्कळ भाषा शिकलो. हिंदुस्थानी, उर्दू, गुजराथी, बंगाली, नेपाळीसुद्धा. पण मराठी मात्र शिकलो नाही. याचे कारण एकच माझी बायको महाराष्ट्रीय आहे. मला मराठी कळते असं समजल्यावर ती मराठीतूनही मला दटावीत राहील, अशी मला भीती वाटली.' त्यांच्या या प्रत्ययकारी आणि घरगुती विनोदाला पुणेकर श्रोत्यांनी हशाच्या रूपाने जोरदार दाद द्यावी हे अगदीच स्वाभाविक होते. पण पुढे माणेकशांनीच सगळ्यांना गंभीरही केले. सावरकरांच्या पुतळ्याचे अनावरण हा मान आयुष्यात मिळालेला सर्वोच्च मान आहे असे मी समजतो—असे जेव्हा ते म्हणाले तेव्हा लोकांनी प्रचंड टाळ्या तर दिल्याच, पण अनेकांची मने एकदम हेलावून गेली. माणेकशा पुढे म्हणाले, 'सावरकरांनी आयुष्यात खूप दुःख भोगले. देशाचे पराभव पाहिले. ते थोडे लवकर गेले. ७१ च्या बांगला युद्धाच्या वेळी ते जिवंत असावयास हवे होते. त्यांचे सगळे दुःख नाहीसे झाले असते आणि फार मोठी कृतकृत्यता त्यांना प्राप्त झाली असती. सावरकर त्यावेळी असते तर कदाचित ते मला म्हणाले असते, 'अरे, एवढे मोठे सैन्य तुझ्याजवळ असताना आणि सर्व देशातली जनता तुझ्या पाठीशी एकदिलाने उभी असताना, हा बांगला देश जिंकायला तुला तेरा दिवस का लागले ?' आज सावरकरांनी हा प्रश्न विचारला तर मग मी म्हटले असते की, 'महाराज, हा दोष थोडासा माझा आहे. मला मान्य आहे. पण आपलीही थोडी चूक आहे. आपण जर लवकर निघून गेला नसता तर मी सात दिवसात बांगला देश जिंकून दाखवला असता आणि फक्त ९३००० शत्रू सैनिक पकडले त्याऐवजी तीन लाख शत्रुसैनि-कांना पकडले असते.'

माणेकशांच्या या औचित्यपूर्ण उद्गारात काय नव्हते ? त्यात वक्तृत्वाचा विलास होता. विनोदबुद्धी होती. नम्रता होती आणि सावरकरांच्या जयिष्णु देशभक्तीला केलेले ते अभिनव वंदनही होते. या पुतळ्याच्या अनावरणप्रसंगी ज्या जातीचे वक्तव्य प्रकट व्हावे असे असंख्य श्रोत्यांना मनोमन वाटत होते, त्याच जातीचे ते वक्तव्य होते. 'शूर मर्दाचा पवाडा, शूर मर्दाने गावा' या मऱ्हाठी म्हणीचे ते प्रत्ययकारी दर्शन होते.

¤

सावरकरांचा हा पुतळा ज्या चौथऱ्यावर उभा केला आहे तो चौथरा चांगला विस्तीर्ण आहे. संध्याकाळच्या वेळी अनेक जणांना तिथे प्रसन्नपणे बसता येईल, इतका तो मोठा आहे. तसे लोकांनी इथे यावे आणि बसावे असे महापौर म्हणालेही. त्याप्रमाणे लोक येतील आणि इथं बसतीलही. संध्याकाळच्या उदास रम्य वेळी चार-दोन पेन्शनर येतील आणि या चौथऱ्यावर बसून एकमेकांना घडीभर जिवाभावाची सुखदुःखे सांगतील. तरुण मुलांचे एखादे टोळके येईल आणि या कट्ट्यावर बसून आपल्या वयाला शोभेल अशा गप्पागोष्टी करील. कदाचित चांदण्या रात्री एखादे प्रेमिक जोडपे याच चबुतऱ्या-वर बसेल आणि मनात खोलवर रुजलेले भाव ते एकमेकांना सांगतील. हे सगळे होणारच. ते अटळच आहे. पण त्याबद्दल कुणाला खंत वाटण्याचे कारण नाही. कुणीही यावे आणि इथं बसावे. आपली सुखदुःखे एकमेकांना सांगावीत. त्याला हरकत कसली ? पण ही सुखदुःखे सांगितल्यावर केव्हातरी त्यांची दृष्टी वर या पुतळ्याकडे जावी, सावरकरांचा आवेशपूर्ण बाहू पाहून त्यांना त्यांचे ते न ऐकलेले आवेशपूर्ण वक्तृत्व आठवावे. ती समुद्रातली त्रिखंडात गाजलेली उडी आठवावी. 'मी म्हणजे या हिंदुराष्ट्राने फोडलेली अखेरची किंकाळी आहे...' यासारखे त्यांचे एखादे काव्यमय सूत्र मनात झिरपावे. 'तुम्ही आम्ही सकळ हिंदु...बंधु बंधु' हे वचन आठवावे. 'हे आपुले कुलही त्यामधि ईश्वरांश । निर्वंश होऊन उरेल अखंड वंश' ही त्यांची तेजस्वी वाणी आठवावी. 'सागरा प्राण तळमळला' हे उत्कट गीत आठवावे आणि त्यांचे हृदय केव्हातरी एकदा भरून यावे. केव्हातरी एखाद्या वेळेस त्यांनी आपली मान किंचित झुकवावी मनोमन नमस्कार घालावा. बस्स ! एवढे जरी या पुतळ्याच्या पायथ्याशी अधूनमधून घडले तरी ते पुरेसे आहे. आणखी दुसरे काहीही नको.

□ □

जयप्रकाश चळवळीमुळे बिहारमध्ये तरी

# उजव्या कम्युनिस्टांचा धुव्वा उडालेला आहे

## निळू दामले

बिहारच्या चळवळीने खूप चांगल्या गोष्टी केल्या, त्यातली एक खूप चांगली गोष्ट म्हणजे भारतीय कम्युनिस्ट उघडे पडले; त्यांच्या भोंदूगिरीवर, दांभिकतेवर, खोटेपणावर बिहार चळवळीने नेमके बोट ठेवले.

कम्युनिस्ट म्हणजे संघटना, कम्युनिस्ट म्हणजे लढवय्ये, कम्युनिस्ट म्हणजे दीन दलितांचे त्राते वगैरे लोकांची समजूत आहे, असते. स्वत: कम्युनिस्टही त्याच भ्रमात वावरत असतात. त्यांच्यातही भ्रष्टाचार असला तरी फारच थोडा असतो, त्यांची संघटना फार मजबूत असते, त्यांचे कार्यकर्ते फार प्रामाणिक असतात असेही (गैर)समज समाजात आहेत. मीही काही प्रमाणात या गैरसमजांची शिकार झालो होतो.

बिहारच्या आंदोलनाने आणि बिहार भटकंती नंतर आता माझे हे सर्व गैरसमज दूर झाले आहेत. नक्षलवाद्यांबद्दल किंवा नक्षलवादी चळवळीबद्दल असलेली थोडीशी आपुलकी–आदराची भावनाही आता नष्ट झाल्यात जमा आहे.

कम्युनिस्टांची मक्का म्हणजे बंगाल. बिहार हाही त्यांचा एकेकाळचा मोठ्ठा अड्डा किंवा बालेकिल्ला. त्यांच्या या दोन राज्यात त्यांचे नेमके काय धंदे चालत होते त्याची कल्पनाच कधी त्यांनी बाहेरच्या जगाला येऊ दिली नाही. त्यामुळेच कदाचित गैरसमजाला वाव राहिला असावा. एक तर बाहेर काही कळून द्यायचे नाही, आणि कळल्यावर कोणी जर चर्चा करू लागला तर 'सी. आय. ए. चे दलाल, कामगारांच्या पाठीत सुरा खुपसणारे, भांडवलशाहांचे हस्तक, बूर्झ्वा' अशा शेलक्या शिव्या आणि धमक्यांनी चर्चा उपस्थित करणाऱ्याला पळवून लावायाचे ही रणनीती सतत कम्युनिस्टांनी वापरली. त्यात आणखी गोबेल्सप्रमाणे असत्य वारंवार सांगण्याची नीती! घोडयाचे चष्मे लावलेले असंख्य कार्यकर्ते पोपटाप्रमाणे खास भाषेत पोथीची पारायणे करीत असतात. रशियात जे काही घडले ते कसे चांगले आहे (आणि नेहमीच असते) हे पटवीत असताना जणू काही ते सर्व भारतीय कम्युनिस्टांनीच केले आहे अशा आविर्भात ही मंडळी वागत राहिली. अशा अनेक कारणामुळे कम्युनिस्टांबद्दल गोड गोड गैरसमज भारतभर पसरले.

जगातल्या अन्य कम्युनिस्टांची काय अवस्था आहे ते कळायला मार्ग नाही. पण भारतीय कम्युनिस्टांबाबत तरी वरील सर्व समज खोटे आहेत असेच म्हणावे लागेल. मार्क्स जिवंत नाही ही भा. क. पा. च्या दृष्टीने फारच सोयीची गोष्ट आहे. नाहीतर 'बेटा डांगे! मला तुझी लाज वाटते' असेच मार्क्सला म्हणावे लागले असते.


बिहार आंदोलनाला भा. क. प. चा विरोध आहे. अगदी पहिल्यापासून.

आंदोलनाची सुरुवात ज्या छात्रनेता परिषदेपासून झाली. त्या नेता परिषदेतून कम्युनिस्ट प्रणित युवक संघटना दूर झाली. रशियाशी कसे संबंध असावेत या प्रश्नावरून अनावश्यक असताना हा प्रश्न परिषदेत महत्त्वाचा ठरला आणि बाकीचे विद्यार्थी नेते आपल्याला कोणत्याच देशावर अवलंबून राहाण्याची पाळी येऊ असे म्हणत असताना कम्युनिस्ट प्रणित विद्यार्थी संघटनेचे नेते मात्र आपला संबंध रशियाबरोबर वाढता असावा ते आपले चिरकालचे मित्र रहावेत अशा प्रकारच्या मुद्दावर अडून बसले आणि मुळातच आपला छात्र नौजवान संघर्ष मोर्चा वेगळा करून आंदोलनापासून दूर झाले. तेथपासून आजतागायत कम्युनिस्ट मंडळी आंदोलनापासून दूर आहेत.

कम्युनिस्ट मंडळींचा चावटपणा लक्षात घेण्यासाठी आधी बिहार चळवळीचे यश नेमके कशात आहे ते झटकन पहावे लागेल.

चळवळीच्या दोन महत्त्वाच्या अवस्थेत बिहारात मी भटकंती करून आलो. १८ मार्च पासून सुरू झालेली ही चळवळ छोटा नागपूरचा काही भाग वगळता जवळ जवळ सर्व बिहारभर अजूनही म्हणजे सुमारे एक वर्ष जिवंत आहे आणि काँग्रेस सरकारच्या हटवादी धोरणामुळे ही चळवळ खेडयापाडयातही आता चांगलीच रुजली आहे हे माझ्या भटकंतीत प्रकर्षाने जाणवले. सिमरी सारख्या भोजपूर जिल्ह्यातल्या एका गावात १२ ऑगस्टपासून सामाजिक बहिष्कार चालला आहे. आणि आता तर तेथे जनता सरकार उभे राहिले आहे. ज्या माणसांना मी ऑगस्ट महिन्यात भेटलो होतो त्यापैकी एखादा अपवाद वगळता सर्व युवक किंवा प्रौढ कार्यकर्ते फेब्रुवारीतही सक्रीय असल्याचे मला आढळून आले. समाजातल्या सर्व थरांचा, वर्गांचा, जातींचा पाठिंबा आंदोलनाला आहे. छोटया शेतकऱ्यांची किंवा शेतमजुरांची मुले आंदोलनात आहेत. शेतकरी व शेतमजूरही आपली रोजी रोटी सांभाळून जमेल तेव्हा आंदोलनात येत असतात. सर्वच शेतमजुरांचा व छोटया शेतकऱ्यांचा पाठिंबा आहे असे मी म्हणणार नाही. पण बहुसंख्यांकांचा आहे असे मात्र मला निश्चितपणे जाणवले. कामगारांबाबतही तसे म्हणता येईल. त्यांचाही पाठिंबा चळवळीला आहे. पण तो व्यक्त होण्याचे मार्ग अजून चोखाळले गेलेले नाहीत. कामगार चळवळीत जे दोष आहेत तेच आज मुख्यत्वेकरून कामगाराला व्यापक अशा चळवळीत सहभागी होऊ

पृष्ठ १३ वर



१८ मार्च ७४ पासून सुरू झालेली जयप्रकाशांची चळवळ
छोटा नागपूरचा काही भाग वगळता जवळजवळ सर्व बिहारभर
वर्ष उलटले तरी अजून जिवंत आहे.






एका मजुराच्या हस्ते झेंडावंदन झाले.
आणि काही गावातून जनता सरकारेही उभी राहिली.
अर्ध्यातच तात्पुरती.
कारण अशी सरकारे केव्हाच, कुठेही कायमची टिकत नसतात.
ती क्रांतिकाळाची फक्त एक खूण असते.






महाराष्ट्रातील विद्यार्थी, प्राध्यापक वर्ग रस्त्यावर येऊन पाहतो आहे.

पण जयप्रकाशांच्या सांगण्यावरून नव्हे तर......



...तर
७०० ते १६००
ही ग्रेड मिळावी म्हणून



१ मार्च माणूस अंकात अनिल किणीकरांनी प्राध्यापकांना उद्देशून लिहिलं आहे....
' परीक्षांवरील बहिष्काराचा निर्णय अधिक विचाराने, गांभीर्याने
घेतला जायला हवा........
विद्यार्थी या साधनांचाही गैरवापर नको '

## म्हणून हे जनआंदोलन आहे....

पृष्ठ आठ वरून

देत नाहीत. आपला पगार सोडायला कामगार तयार नाही, त्याची झटापट फक्त वेतन श्रेणीसाठीच असते. म्हणून कामगारांनी प्रचंड मोर्चे काढणे, निदर्शने करणे अशा स्वरुपात कामगारांचा पाठिंबा वेगळेपणाने अभिव्यक्त झालेला नाही. तशी शक्यता आज घडीला दिसत नसली तरीही आंदोलनाला विरोध असणाऱ्या कम्युनिस्टांच्या कामगार संघटनांची सभासद संख्या कमी होणे व आंदोलनाला पाठिंबा देणाऱ्या संघटनांची सभासद संख्या वाढणे ही वस्तुस्थिती कामगारांचा चळवळीबद्दलचा दृष्टिकोन पुरेसा दाखवून जाते.

पलामू जिल्ह्यात जपला या गावी सिमेंटच्या कारखान्यात काँग्रेस प्रणीत इंटकची युनियन होती. त्यांनी उघडपणे जाहीर सभा घेऊन आपल्या युनियनतर्फे जे. पीं.चा सत्कार केला आणि त्यांना सोळा हजाराची थैली दिली.

थोडक्यात असे म्हणता येईल की समाजातल्या सर्व प्रमुख घटकांचा पाठिंबा या आंदोलनाला आहे, वाढता पाठिंबा आहे. गेल्या वर्षभरात सरकार काही कामच करू शकलेले नाही. आंदोलन तोडण्यात सरकार पूर्णतया अयशस्वी ठरले आहे.

मध्यमवर्गी, जमीनदार, उच्च जातीचे लोक, ही सर्व मंडळी या आंदोलनात आहेत हे खरे आहे. पण ही मंडळी सर्वच पक्षात आहेत. थेट क्रांतीकारी कम्युनिस्टांच्यात सुद्धा. समाजातल्या असंतोषाच्या मुळात असणारे ते घटक आंदोलनाबरोबर वर्षभराच्या काळात असूनही त्यांचा प्रभाव आंदोलनावर पडलेला नाही. हा भाग महत्वाचा आहे. जमीनदारांच्या (प्रमाण बाऊ करण्याएवढे नाही.) उपस्थितीमुळे जमिनीच्या फेरवाटपाच्या कार्यक्रमात जे. पीं. नी कोणताही बदल केलेला नाही. अन्य जे काही १४।१६ कलमी कार्यक्रम जे. पीं.नी आंदोलनाच्या सुरुवातीला दिले त्यात कोणताही 'प्रतिगामी' बदल झालेला दिसत नाही. याचाच अर्थ असा होतो की या घटकांना आंदोलनाच्या संदर्भात जे. पीं. नी निष्प्रभ केले आहे.

म्हणून हे जनआंदोलन आहे.

प्रादेशिक किंवा अन्य विकास वा फायद्याचे कोणतेही आमीष न देता समाजाच्या व्यापक प्रश्नावर लोकांना विचार करायला लावून, सक्रीय व्हायला लावणे हे आजपर्यंत कोणालाच जमले नव्हते. प्रश्नांच्या गुंतागुंतीच्या चिखलातून समाजाला बाहेर काढल्याचे सर्वंकष आंदोलन आजपर्यंत कोणी उभे केले नव्हते. क्रांतीचा घोषा लावणाऱ्या कम्युनिस्टांनाही खुर्ची पलीकडचे पाहता आले नाही. अशा स्थितीत व्यक्तिगत स्वार्थापलीकडे माणसाला जायला लावून एक दीर्घकाळ चालणारे आंदोलन विद्यार्थ्यांच्या सहकार्याने जे. पी. उभे करतात हेच फार मोठे नवल, आश्चर्य, अभूतपूर्व, अघटित असे घडले आहे. फार मोठे यश आहे हे. झालंय हे खूप झालंय असं म्हणून जे. पी. थांबले तरीही चालेल इतके या चळवळीचे यश आहे.

आणि तरीही कम्युनिस्टांना हे आंदोलन मान्य नाही.

### किती खोटेपणा !

डांगे स्वतःची पाठ थोपटून घेत होते. ते असे म्हणतात की त्यांनी बिहारात आंदोलनाला फार चांगला आणि यशस्वी विरोध केला आहे. काँग्रेसपेक्षा त्यांनीच जास्त चांगली कामगिरी बजावली असा त्यांचा दावा आहे.

किती खोटेपणा.

एक मोर्चा नोव्हेंबरात त्यांनी काढला. फुकट प्रवासाची सोय इंदिराबाईंनी केली होती. २५ लाख रुपये त्यासाठी प्रदान करण्यात आले होते. सरकारी गाड्या भरभरून कम्युनिस्ट निदर्शकांना कानाकोपऱ्यातून आणण्यात आले.

एवढे करून त्यांची संख्या जमली ३० हजाराच्या आसपास.

सरकारी कृपेने आणि लिकवाल्यांच्या सवयीने हा आकडा तीन लाख इतका फुगवण्यात आला.

त्यानंतर आणि त्या आधी कम्युनिस्टांच्या सभा किंवा अन्य प्रकारचा विरोध बिहारात झालेलाच नाही. हजारीबागला कामगार संघटनेच्या बैठकीत अल्लू डुर्र अशा डरकाळ्या मारायच्या हाच डांग्यांचा खाक्या. महाराष्ट्रात लोकांना वाटते की डांग्यांची प्रचंड सभा वगैरे झाली. पण तसा काहीही प्रकार नसतो.

गेल्या वर्षभराच्या काळात जाहीरपणे त्यांनी घेतलेली सभा (जून–नोव्हेंबर मधले मोर्चे सोडून) म्हणजे ललित नारायण (लायसेन्स नारायण !) मिश्रांच्या निधनाबद्दलची शोक सभा. या त्यांच्या शोक सभेला सर्व मिळून पाचशे माणसेही नव्हती. गांधी मैदनावर त्यांची सभा चालू असताना आसपास मुले चक्क क्रिकेट खेळत होती. कोणीही त्यांच्या सभेकडे ढुंकूनही पहायला तयार नव्हते. सभेतही मिश्राच्या गुणांचा गौरव वगैरे प्रकार नाहीच (कसा असणार! आडच रिकामा!) व्हिएतनाम, किसींजर यावरच जास्तवेळ भाषण आणि जे. पीं. ना शिव्या.

तेव्हा मुळात कम्युनिस्ट जे भासवतात की त्यांनी बिहार आंदोलनाला विरोध चालवलाय ते खरे नाही. त्यांच्या सभा होत नाहीत, निदर्शने होत नाहीत, अधेमधे पत्रके काढतात तेवढेच. इंदिरा बाईंनी खरे म्हणजे नीट पहावे आणि विरोधासाठी दिलेला पैसा डांग्यांकडून काढून घ्यावा..

रोहतास या जिल्ह्यात चांद या गावात जनता सरकारची स्थापना करण्याच्या प्रसंगी मी गेलो होतो. बरोबरच बसमधून बालमुकुंद शर्मा नावाचा भा. क. प. नेता प्रवास करीत होता. मूळ याची परिस्थिती (आर्थिक) कधीच चांगली नव्हती. पण आता सरकार आणि काँग्रेसपक्ष यांच्याकडून पैसा खूप मिळायला लागल्यामुळे बालमुकुंदची तब्येत चांगली आहे. जनता सरकारच्या स्थापनेच्या आधी नालकर हा शर्मा गावाच्या मुख्य चौकात उभा राहून जे. पी. ना शिव्या देऊ लागला. जे. पी. मूर्ख आहेत, सी. आय. ए., टाटा–बिर्ला यांचे दलाल आहेत वगैरे वगैरे. चांद या गावचे सरपंच व्हायचीही जे. पी. ची लायकी नाही असे तो जोर जोरात ओरडत होता. मी थोडासा घाबरलो होतो. आता याला लोक मारतील अशी भीती वाटत होती. कारण ५ हजार लोकवस्तीच्या या गावात जनता सरकार स्थापनेसाठी बाहेरचे व गावातले मिळून ४ हजार लोक जमले होते.

पण तसे काही घडले नाही. पोरा टोरासह २००।३०० लोक

पृष्ठ २६ वर

# सो ल क ढी

## □ सत्कार सोहोळ्यातून समाजप्रबोधन

तीन-साडेतीन महिन्यांपूर्वी, आपले वसंतराव फुलसिग नाईक मुख्यमंत्री असताना, महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात वाढ झाली होती. या वाढीचा सगळा तपशील सांगण्यात काही हशील नाही. पण यावेळी एक गोष्ट मात्र भक्कम घडली : कोल्हापूर आणि आसपासला मंत्री मिळाला. अख्खा नाही; अर्धा. रत्नाप्पा कुंभार यांना गृह आणि प्रसिद्धी खात्याचे राज्यमंत्री करण्यात आले. वास्तविक त्यांना अख्खे मंत्री केले असते तरी ते योग्य, उचित आणि स्वाभाविकच झाले असते. कारण रत्नाप्पा कुंभार म्हणजे काही साधा सुधा माणूस नाही. ते अनेक वर्षे काँग्रेसची आणि काँग्रेसच्या प्रभावी माध्यमातून देशाची निरलस सेवा करून राहिले आहेत. सहकारी चळवळीत, रत्नाप्पांचा झेंडा आघाडीवर राहिला आहे. अशा अव्वाहातसव्वाहात माणसाला, अर्धे आयुष्य मागे टाकल्यावर, राज्यमंत्रिपद मिळाले त्यासाठी काही नौबत-नगारे वाजणार नाहीत, असे आम्ही गृहीत धरून चाललो होतो.

पण आजकाल काही गृहीत धरून चालायची सोयच नाही. बाकी सगळे मानसन्मान कोठे आणि मंत्रिपद कोठे ? पक्षकार्यकर्त्याच्या निरपेक्ष सेवेला मंत्रिपद लाभाशिवाय खरीखुरी शोभा नाही. त्यात पुन्हा मंत्रिपद लायक आणि अधिक लायक कार्यकर्त्यांनाच नेमके मिळते. त्यामुळे एखाद्याला मंत्रिपद मिळाल्यावर त्याच्या लाजबाब लायकीबद्दल कोणाच्या मनात शंका म्हणून राहत नाही. तेव्हा रत्नाप्पा मंत्रिपदावर आले, जे व्हायला हवे होते, पण होत नव्हते, ते झाले होते, एवढ्यासाठी त्याच्या स्नेह्यांनी–हितचिंतकांनी सत्कारसोहळ्यांची गडगंज गडबडगर्दी उडवून दिली.

या बेसुमार सत्कारसोहळ्यांनी काही अतिविचारी मंडळींचे डोके फणफणले. दिवस कोणते आणि सत्कार कसले करता ? असा फटकप्रश्न त्यांनी विचारला आहे. सत्कार-सोहळ्यांनी काही बरे साधत नाही, असे या मंडळींना वाटते. त्यांची दृष्टीच भेरकाळी आहे असे म्हटले पाहिजे. खरी गोष्ट अशी आहे की अशा सोहळ्यातून आपला टमाम मोठेपणा मिरवावा, निसरडेघसरडे बोलून स्पष्टवक्तेपणाचे श्रेय मिळवावे, स्थानिक अधिकारी–कार्यकर्त्यांना बांधून घ्यावे, असे काही मंत्र्यांचे धोरण नसते. त्यांच्या लेखी सत्कारसोहळा हे एक शुभनिमित्त असते, त्यावेळी सर्व प्रकारची गर्दी जमते; आणि समाजमानस नेमके कळायला अशी गर्दी मदत करते. त्या प्रसंगी होणाऱ्या चर्चेत अनेक प्रश्नोपप्रश्नांचे खरे स्वरूप समजून येते. गर्दीच्या विचारांना आणि कार्यप्रवणतेला चालना देता येते. त्यामुळे मंत्र्यांचे सत्कार-सोहळे हे वस्तुतः समाजशिक्षणसोहळे अथवा समाजप्रबोधन सोहळेच आहेत. या बिकट दिवसात समाजाला शहाणे करायचे ते एक मोठे बहुगुणी माध्यम आहे.

रत्नाप्पांना याची जाणीव आहे. म्हणूनच त्यांनी सत्कारसोहळ्यांच्या सर्वसगळ्या कार्यक्रमांना उत्साहाने मान्यता दिली. तसे त्यांनी जाहीरपणे पुन्हा पुन्हा सांगितले त्याप्रमाणे या सत्कारसोहळ्यांच्या माध्यमातून महाराष्ट्रातला केवढामोठ्ठा समाज रत्नाप्पा कुंभारांनी गेल्या काही दिवसात प्रबोधित करून सोडला असेल याची कल्पना केली म्हणजे ऊर कसा भर्भरून येतो.

मंत्रिपदाच्या इतर आनुषंगिक जबाबदाऱ्यांमुळे, जनतेला, संभोगातून समाधीकडे या न्यायाने सत्कारसोहळ्यातून समाजप्रबोधनाकडे न्यायच्या सत्कार्यात, नाही म्हटले तरी वेळोवेळी थोडासा खंड पडतो, यावर कोणीतरी एक स्वतंत्र सत्कारमंत्री नेमण्याची सूचना केली होती. मला ती तितकीशी पसंत नाही कारण असे की एखाद्या स्वतंत्र सत्कारमंत्र्यानेच कायम समाजप्रबोधन करायचे म्हणजे त्या प्रबोधनाला एकांगीपणा येणारच त्याऐवजी सत्कारसोहळे करवून घेणे ही अख्ख्या मंत्रिमंडळाने आपली वैयक्तिक आणि सामुदायिक जबाबदारी मानून ती न कंटाळता पार पाडण्यासाठी मोलाचा जीव व्याकुळ केला पाहिजे.

शंकरराव चव्हाणांच्या नेतृत्वाखाली घडलेल्या महाराष्ट्राच्या नव्या मंत्रिमंडळाने ( यात रत्नाप्पा कुंभार अख्खे मंत्री झाले असून त्यांच्याकडे अन्न आणि नागरी पुरवठा ही खाती आली आहेत. म्हणजे पुन्हा सत्कार. ) कारभार सुधारायचे, दौरे कमी करायचे, अकरा वाजता सचिवालयात यायचे, आणि तेथे काम करायचे वगैरे विनोदी संकल्प नव्या नवलाईने सोडले आहेत. त्यात, आम्ही सुचवलेला, सत्कार करवून घ्यायचा जनताजपणुकीचा एक गंभीर संकल्प असता तर किती बरे झाले असते. अर्थात वेळ अजूनही गेलेली नाही. पण ती जाईल.

## □ पराक्रमी पाटलिणबाई

ज्या प्रदेशातल्या स्त्रिया पुढारलेल्या असतात तो प्रदेश मागासलेला असूच शकत नाही. आपला महाराष्ट्र मागासलेला नाही कारण येथील स्त्रिया पुढारलेल्या आहेत. महाराष्ट्रातल्या स्त्रिया टपालकचेऱ्या चालवतात, बँका चालवतात, डोके आणि तोंड चालवतात. स्वातंत्र्यपूर्वकाळात इथे केवढ्या-


बॉबे डाइंग
एकमेव वितरक
पराग
डेक्कन जिमखाना पुणे-४ लक्ष्मीरोड पुणे-३०
मिलच्या दरांत खरेदी करा !
मिलच्या दुकानांत खरेदी करा !!
सुपर ऑफर

तरी ज्वाला आणि ज्योती होऊन गेल्या. स्वातंत्र्यानंतरच्या महाराष्ट्राच्या राजकारणात स्त्रियांनी स्त्रियांच्या भूमिका चोख वठवल्या आहेत. विरोधी पक्षांचे सोडा, काँग्रेसमध्येसुद्धा, हळदीकुंकवाला किंवा मंगळागौरीला जमाव्या तशा, एकाच वेळी, मुबलक व पुढारलेल्या स्त्रिया गोळा झाल्या होत्या. ताई कन्नमवार, वत्सलाबाई नाईक, निर्मलाराजे भोसले, कुसुमताई वानखेडे, कुसुमताई चौधरी, प्रतिभाताई पाटील, ताराबाई वर्तक, विमलताई रांगणेकर, तारा चेरियन, बेगम अलियावर जंग, शालिनीताई पाटील—नावे तरी किती घेणार? शिवाय शालिनीताई पाटील यांचे नाव घेतल्यावर थोडे थांबावेच लागते. कारण नावाबरोबरच त्यांच्या अपौरुषेय कर्तृत्वाचा ढिगारा उभा राहून धाप लागते.

शालिनीताई महाराष्ट्राच्या इवल्या—इंदिरा आहेत. त्यांनी डायरेक्ट इंदिरा गांधीपासून प्रेरणा घेतली आहे. इंदिरा सहकारी बँक (स्त्रियांनी, स्त्रियांसाठी चालवलेली, स्त्रियांची पहिली बँक) निर्माण करून शालिनीबाईंनी महाराष्ट्रातल्या स्त्रियांना आर्थिक प्रश्न समजावून द्यायचे जे कालोचित कार्य चालवलेले आहे ते केवळ अजोड आहे. बँक ही एक गोष्ट झाली. त्यांनी एकूणच समाजजागृतीचे कार्य विनदिखाऊ निष्ठेने चालवलेले आहे. आपल्या भाषणातून त्या नवे, मौलिक, उपयुक्त, आणि क्रांतिकारक विचार, गव्हले वळावे तितक्या सहज, सांगत असतात. गार्गी, द्रौपदी, सुलताना रझिया, जिजाबाई, रमामाधवबाई,, इंदिरा गांधी, दुर्गा भागवत, सौ. जयश्री घुरी, छाया दातार यांच्यासारख्या कर्तबगार स्त्रियांमधले सर्वोत्कृष्ट गुणविशेष एकवटूनच या पराक्रमी पाटलिणबाईंचा अवतार घडला असावा, असे अनेकांना वाटते.

काही महिन्यांपूर्वी, शालिनीबाईंनी, एक महान लोकशाही सिद्धांत महाराष्ट्राला शिकवण्याची कोशिश केली. त्यांनी सांगितले, महाराष्ट्रात जातीचे मराठे बहुसंख्येने असल्यामुळे महाराष्ट्राचा मुख्यमंत्री मराठा जातीचा असला पाहिजे. त्याबरोबर, शालिनीबाई किचुंद्री मनाच्या आहेत, त्या जातीय वृत्तीने बरबटलेल्या आहेत, त्या लोकशाहीच्या (आणि समाजवादाच्यासुद्धा) दुष्मन आहेत, असा कर्कश कोलाहल सगळीकडे माजला. व्रतस्थ योगिनीप्रमाणे शालिनीबाईंनी तिकडे लक्षच दिले नाही. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री निवडण्याचा प्रसंग नुकता खरोखरच उद्भवला तेव्हा शालिनीबाईंनी आपल्या लोकशाही-सिद्धांताचा आग्रहाने पुनरुच्चार केला. पण बुरसटलेल्या महाराष्ट्राने काही त्यांचे ऐकून घेतले नाही. महाराष्ट्राने केवळ गुणवत्तेचा विचार करून मुख्यमंत्री मराठवाड्याचा निवडला. यावेळी तर, उसळलेल्या कर्कश कोलाहलात खुद्द वसंतदादा पाटलांनी आपला निषेधाचा सूर मिसळून दिला. वसंतदादा पाटील म्हणजे शालिनीबाई पाटील (बी. ए. एल्. एल्. बी.) यांचे पती. महाराष्ट्राचे पाटबंधारे-मंत्री. ते मराठा जातीचे असले आणि शालिनी-सिद्धांताप्रमाणे मुख्यमंत्रिपदासाठी हवेतेवढे लायक असले तरी ते शालिनीबाईंप्रमाणे संकुचित जातीयवादी नाहीत. त्यांचे मन ऊसमळ्यासारखे विशाल आणि रेशनबाहेर मिळणाऱ्या साखरेसारखे शुभ्रमधुर आहे. अशी माणसे तत्त्वाशी तडजोड करत नाहीत. व्रतस्थ योग्याप्रमाणे वसंतदादा पाटील म्हणाले : काही कारण नसताना माझी पत्नी (म्हणजे शालिनीबाई बी. ए. एल्. एल्. बी.) कोठेही काहीही बोलते त्याचा मला त्रास होतो. अधिकाराची हाव मला नाही. त्यासाठी मी कोणतीही खटपट करत नाही. माझी बायको मूर्खपणाने काही भकते—मी त्याच्याशी बिलकुल सहमत नाही, हे लोकांना कसं पटवायचं याची याची मला चिंता पडली आहे.

वसंतदादा पाटील शूर आहेत. बायकोचे बरोबर आहे असे सुद्धा घरातल्या घरात म्हणायची माझी हिंमत नसते. आणि हा पठ्ठे बापूराव बायकोचे चूक आहे असे जाहीरपणे सांगून गेला. केवळ एवढ्याठी, त्यांची इच्छा नसली तरी, वसंतरावांनाच मुख्यमंत्रिपद मिळावे, असा निकराचा आग्रह आपली अस्मिता जपू पाहणाऱ्या महाराष्ट्रातल्या नवऱ्यांनी धरला पाहिजे.

मात्र वसंतदादा पाटलांच्या ढोबळ शौर्याचे कौतुक करायच्या भरात शालिनीबाई पाटलांनी अंगिकारलेल्या महाराष्ट्राचे वैचारिक संगोपन करायच्या मातृवत्सल जबाबदारीकडे आपले दुर्लक्ष होऊन चालणार नाही.

—अनंतराव




# भारत-पाक
## बड्यांचे संघर्षक्षेत्र
### वा. दा. रानडे

काश्मीरमध्ये शेख अब्दुल्लांच्या हाती पुन्हा सत्ता, पाकिस्तानला पुन्हा शस्त्रपुरवठा सुरू करण्याचा अमेरिकेचा निर्णय, परराष्ट्रमंत्री यशवंतराव चव्हाणांची अमेरिका भेट रद्द आणि रशियाचे संरक्षणमंत्री ग्रेचको यांच्या नेतृत्वाखाली रशियन लष्करी शिष्टमंडळाची भारतास भेट–एकाचवेळी घडलेल्या या साऱ्या घटनांचे भारतीय उपखंडातील राजकारणावर दूरगामी परिणाम होणार आहेत.

शेख अब्दुल्लांच्या हाती काश्मीरची सत्ता गेल्याने काश्मीरचा प्रश्न कायमचा सुटला असे म्हणता येईल का? 'भुट्टो थोडासा आरडाओरडा करतील पण हा प्रश्न कायमचा मिटला असे म्हणायला हरकत नाही, युनोत हा प्रश्न आता पुन्हा उपस्थित होणार नाही.' अशी प्रतिक्रिया 'लंडनटाइम्स'ने व्यक्त केली आहे. सध्याची युद्धतहकुबी रेषा हीच फाळणी रेषा मानून काश्मीर प्रश्न निकालात काढावा अशा सूचना यापूर्वी अनेकदा करण्यात आल्या आहेत पण हा प्रश्न निकालात काढण्यापेक्षा चिघळत ठेवणे हेच भुट्टोंच्या हिताचे आहे. काश्मीर प्रश्नावर पुन: एखादे युद्ध करण्याचे त्यांचे मनसुबे आहेत. अमेरिकेकडून मिळणाऱ्या शस्त्रांचा उपयोग त्यासाठी करण्यात येईल. सीमाप्रांत व बलुचिस्तानातील बंड मोडून काढणे भुट्टोंना फार कठीण जात आहे. या बंडाचा जोर कमी व्हावा म्हणून या दोन्ही प्रांतातील टोळीवाल्यांचे लक्ष दुसरीकडे वेधण्यासाठी पाक काश्मीरमध्ये पुन्हा जिहादचा पुकार करण्याची शक्यता आहे. शेख अब्दुल्ला स्वतंत्र काश्मीरचा पुरस्कार करीत होते, सार्वमताची मागणी करीत होते तोपर्यंत पाकला ते जवळचे वाटत होते. पण या दोन्ही मागण्या त्यांनी सोडल्या आणि भारतात काश्मीरचे सामिलीकर कायम स्वरुपाचे मानण्याची तयारी दर्शविली तेव्हा अब्दुल्लाबद्दलचे पाकचे प्रेम संपले. भारत व पाकमध्ये काश्मीर प्रश्नावर वाटाघाटी घडवून आणण्याचा प्रयत्न शेख अब्दुल्ला करणार आहेत पण त्यात यश येण्याची शक्यता दिसत नाही.

शेख अब्दुल्लांशी केंद्र सरकारने केलेल्या कराराचे जनसंघाशिवाय बाकी सर्व पक्षांनी स्वागत केले आहे. काश्मीरला घटनेच्या ३७० व्या कलमानुसार दिलेला खास दर्जा कायम राहाणार आहे. काश्मीरचे सामिलीकरण तात्पुरते होते, सार्वमताने त्याचे अंतिम भवितव्य ठरावयाचे होते, तेव्हा ३७० व्या कलमानुसार काश्मीरला खास दर्जा देणे योग्य होय असे म्हणणे समर्थनीय ठरले असते. पण शेख अब्दुल्लांनी सामिलीकरण कायमचे मान्य केल्यानंतर आता खास दर्जा देण्याची काय आवश्यकता होती? भारतीय संघराज्याचे सर्व घटक सारख्या दर्जाचे हवेत. काश्मीरचा खास दर्जा क्रमाक्रमाने नष्ट करून त्याला इतर संघटकासारखाच घटक बनविण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. या कराराने ती थांबली. काश्मीरचे सामिलीकरण झाले पण भारताशी एकात्म होण्याची प्रक्रिया लांबली.

अमेरिकेकडून शस्त्रे मिळविण्याचा प्रयत्न भुट्टो गेली दोन वर्षे करीत होते त्यांना याच वेळी यश कसे आले? भारतीय उपखंडाच्या आणि हिंदी महासागराच्या राजकारणात अमेरिकेचा दोस्त या नात्याने लष्करीदृष्ट्या प्रबळ पाकिस्तान अर्थपूर्ण भाग घेऊ शकेल अशी अमेरिकेची खात्री भुट्टोंनी पटविली पण अमेरिकेने पाकच्या हितसंबंधापेक्षा स्वतःच्याच हितसंबंधाचे दृष्टीने पाकला शस्त्रपुरवठा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला. हिंदी महासागरात रशियाचा प्रभाव वाढण्याची अमेरिकेला भीती वाटते. तेव्हा रशियाच्या या हालचालींना शह देण्यासाठी पाकचे लष्करी बळ अमेरिका वाढवीत आहे.

केवळ पाकिस्तानलाच नव्हे तर इतर राष्ट्रांनाही अमेरिका वाढत्या प्रमाणात शस्त्रे विकीत आहे याची अनेक कारणे आहेत. इराणचे आखात, हिंदी महासागर यासारख्या लष्करी हालचालींच्या दृष्टीने महत्त्वाच्या क्षेत्रात लष्करी तळाचे हक्क व सवलती मिळविण्यासाठी आणि टिकविण्यासाठी शस्त्रपुरवठा सोयीचा पडतो. अमेरिका सध्या आर्थिक मंदीच्या संकटाला तोंड देत आहे. शस्त्रांची विक्री वाढली तर शस्त्रास्त्र कारखान्यातील कामगारांना रोजगाराची हमी मिळते. तसेच या शस्त्रविक्रीच्या उत्पन्नाचा उपयोग अमेरिकेला नव्या शस्त्रांच्या उत्पादनासाठी व संशोधनासाठी करता येतो. जुन्या लढाऊ विमानांच्या जागी वाय एफ–१६ या जातीची नवी विमाने तयार करण्याच्या योजना अमेरिकन हवाई दलाने आखल्या आहेत. या प्रत्येक विमानाची किंमत साठ लाख डॉलर आहे. आपल्या हवाई दलासाठी ही विमाने तयार करायला अमेरिकेस ३० हजार कोटी डॉलर एवढा प्रचंड खर्च येईल पण अशा विमानांची मागणी इतर राष्ट्रांकडूनही आली तर हा उत्पादन खर्च कमी होईल. बेल्जम, नेदर्लंड्स, डेन्मार्क, नॉर्वे या नाटो राष्ट्रांना आपली जुनी एफ १०४ स्टार फाइटर विमाने बदलावयाची आहेत. त्यांच्याकडून या नव्या विमानांसाठी मागणी मिळविण्याचा प्रयत्न अमेरिका करीत आहे. असे हे अमेरिकेचे राजकारण, शस्त्रकारण आणि अर्थकारण एकमेकांशी निगडित आहे.

हिंदी महासागर विभाग आणि भारतीय उपखंड आता तटस्थ न राहाता बड्या राष्ट्रांचे सत्तास्पर्धेचे व संघर्षाचे क्षेत्र बनले असून भारत व पाक त्यात ओढले जात आहेत. पाक प्रथमपासूनच अमेरिकन गटात असून अमेरिकेने उभारलेल्या सेंटो, आणि सिएटो या लष्करी गटाच्या साखळीचा सभासद आहे. भारत व रशिया यांच्यात वीस वर्षांचा मैत्रीचा करार झाल्यापासून भारत आता तटस्थ राहिला नसून तो रशियन गटाकडे झुकला अशी अमेरिकेची प्रतिक्रिया आहे. बांगला देशच्या प्रश्नावर १९७१ मध्ये पाकशी युद्धाचा संभव दिसू लागला आणि अमेरिका पाकच्या बाजूने हस्तक्षेप करणार असे वाटू लागले तेव्हा आपली बाजू बळकट करण्यासाठी रशियाशी भारताने हा करार केला. रशियाची मदत व सहकार्य भारताने घेतले यात काही चुकले नाही. पण वीस वर्षांच्या दीर्घ मुदतीच्या कराराने बांधून घेण्याची आवश्यकता होती का? या निर्णयाने भारताचे अमेरिकेशी संबंध तर दुरावलेच पण चीनशी संबंध सुधारण्याच्या मार्गात आपण एक मोठा अडथळा निर्माण केला. रशियाच्या प्रभावाखाली गेलेला देश याच दृष्टीने चीन आता भारताकडे पहातो. भारतीय उपखंडात आता एका बाजूला अमेरिका, पाकिस्तान आणि चीन आणि दुसऱ्या बाजूला रशिया, भारत, अफगाणिस्तान, बांगला देश अशा दोन स्पष्ट फळ्या पडल्या आहेत. यातून मोठा संघर्ष नजीकच्या काळातच उद्भवेल असे नाही पण भारत व पाकिस्तानात सहकार्याचे संबंध प्रस्थापित होण्याच्या प्रक्रियेत त्यामुळे अडथळा आला आहे. दोन्ही देशात मधून मधून संघर्ष घडवून आणून दोन्ही देश कमकुवत ठेवायचे, विकासासाठी त्यांना स्थिरता लाभू द्यावयाची नाही हे अमेरिकेचे धोरण आहे.

परराष्ट्रमंत्री चव्हाणांनी अमेरिकेची भेट रद्द केली. पण दुसरीकडे अन्नासाठी त्याच अमेरिकेकडे आपणास भीक मागावी लागत असते. स्वाभिमान आणि लाचारी यांचे दर्शन घडविणाऱ्या या दोन घटना. अन्नधान्याच्या बाबतीत आपण स्वयंपूर्ण झाल्याशिवाय आणि त्यासाठी लाचारी सोडल्याशिवाय आपल्या स्वाभिमानी बाण्याला काही अर्थ राहाणार नाही. □

# पॅपिलॉन



मूळ लेखक : **हेन्री शॅरियर**

अनुवाद : **रवींद्र गुर्जर**

स्वातंत्र्याची पहिली रात्र मनसोक्त उपभोगल्यानंतर पॅपिलॉन आणि मॅच्युरेट या दोघांनी पोलीस चौकीत जाऊन जबाब दिला. काहीही असलं तरी ते बेकायदेशीरपणे त्रिनिदादच्या किनाऱ्यावर उतरले होते. ज्योन्सच्या दुखावलेल्या पायाला प्लॅस्टर लावण्यात आलं. नंतर तिघांनी पुन्हा एक दिवस बोव्हन कुटुंबात मजेत घालवला. रोज संध्याकाळी ते बंदरावर फिरायला जायचे. पोलिस अधिकाऱ्याच्या विनंतीवरून आणखी तिघा गुन्हेगारांना बरोबर घेऊन पॅपिलॉननं त्रिनिदाद सोडलं. समुद्रात त्यांना पुन्हा एका वादळानं गाठलं; पण त्यातून ते सुखरूप बाहेर पडले. पुढे किनारा समोर दिसू लागल्यावर नौका त्या दिशेला वळविण्यात आली, परंतु वाऱ्याच्या प्रचंड वेगामुळे तिच्यावरील ताबा सुटून ती खडकावर आदळली. सुंदर नौकेचा चक्काचूर झाला होता. त्या अनोळखी भागात सहा जण माणसांच्या शोधात पुढे जाऊ लागले. . . . . . . . . . . . . . . . . . . .

## प्रकरण सात : पुन्हा तुरुंगवास

विहिरीजवळच एक लहानसं घर दिसत होतं. त्याचं दार उघडं पाहून आम्ही आत प्रवेश केला. 'हॅलो ! हॅलो !' उत्तर नाही. इकडे तिकडे हिंडल्यावर तिथे दोरीनं तोंड बंद केलेली कॅनव्हसची पिशवी दृष्टीस पडली. मी ती हातात घेतली आणि तिचं तोंड उघडलं, त्याबरोबर दोरी तट्कन् तुटली. त्यात फ्लॉरिन्स् (डच चलनातील नाणी) भरलेली होती. याचा अर्थ आम्ही डच भागात पोचलो होतो. बोनायर, क्युराकाओ किंवा आरुबा. इतर कशालाही हात न लावता आम्ही ती पिशवी तिथेच टाकून दिली. फक्त पिण्याचं पाणी आढळलं ते तेवढं सर्वजण एका भांड्यानं एकामागोमाग एक ढसढसा प्यायलो. घरात आणि घराबाहेर कोणीच नव्हतं. बाहेर पडलो आणि जोन्समुळे हळूहळू चालू लागलो. एवढ्यात एका जुन्या फोर्ड गाडीनं आमचा रस्ता रोखला.

'तुम्ही फ्रेंच आहात ?'

'होय, महाराज !'

'प्लीज, गाडीत बसता का ?' तिघेजण मागच्या बाजूस बसले आणि त्यांच्या गुडघ्यांवर जोन्सला आडवं पसरलं. मी ड्रायव्हर-शेजारी बसलो, मॅच्युरेट माझ्याजवळ बसला.

'तुमचीच होडी खडकावर आदळली ना ?'

'होय.'

'कुणी बुडालं का ?'

'सुदैवानं नाही.'

'तुम्ही कुठून आलात ?'

'त्रिनिदाद.'

'त्यापूर्वी ?'

'फ्रेंच गियाना.'

'गुन्हेगार ?'

'होय.'

'मी डॉक्टर नाल, या जागेचा मालक; इथूनच क्युराकाओ सुरू होतं. याला गाढवांचं बेट म्हणतात. मेंढ्या आणि गाढवं इथे काटेरी निवडुंगावर जगतात. त्या काट्यांना 'क्युराकाओच्या तरुणी' असं म्हणण्यात येतं.'

मी म्हणालो, 'क्युराकाओच्या चांगल्या तरुणींना हे काही फारसं अभिमानास्पद नाही.' तो खूप लट्ठ असलेला माणूस मोठमोठ्याने हसला. दमेकऱ्याच्या उबळीसारखा आवाज करून ती भंगार फोर्ड एकदम बंद पडली. मी एका गाढवांच्या कळपाकडे बोट दाखवून म्हणालो, 'जर ही गाडी पुढे सरकणं कठीण असेल तर आपल्याला ती ओढून सहज नेता येईल.'

'जुन्या गाडीचं हेच तर कठीण असतं,' असं म्हणून त्या माणसानं गाडीचं बॉनेट उघडून आत डोकं घातलं. थोडीशी खुडबूड करून ते पुन्हा बंद केलं. गाडीत बसताना त्यानं इकडे तिकडे अस्वस्थपणे पाहिलं. कच्च्या रस्त्यावरून थडथडत आणि उडत आमचा प्रवास सुरू झाला. लवकरच एक पांढऱ्या रंगाचं झोपडीवजा घर लागलं. त्या जाड इसमानं गाडी थांबवली. एका व्यवस्थित कपड्यातील निग्रोबरोबर तो डच भाषेत काहीतरी बोलला. त्यावर तो निग्रो माणूस, 'यॉ, मास्टर; यॉ, मास्टर' असं म्हणत राहिला. नंतर आमच्याकडे वळून डॉ. नाल म्हणाला, 'मी इथे परत येईपर्यंत या माणसाला तुमच्याजवळ थांबण्याची सूचना दिली आहे. येताना मी तुमच्यासाठी काहीतरी पेय घेऊन येईन, तुम्ही तहानलेले दिसता. बरं आता गाडीतून उतरता का?' आम्ही खाली उतरलो. हिरवळीवर सावलीत जाऊन बसलो. त्याची गाडी पहिल्यासारखा आवाज करीत निघून गेली. मालक दूर गेलेला दिसताच निग्रो नोकर आमच्याशी अनेक भाषांची खिचडी करून बोलू लागला—इंग्लिश, डच, फ्रेंच, स्पॅनिश इ. त्यानं आम्हाला सांगितलं की त्याचा बॉस आम्हाला अत्यंत घाबरला होता आणि पोलिसांना आणण्यासाठीच गेला होता. आम्ही पळालेले चोर आहोत म्हणून त्यालाही स्वतःची काळजी घ्यायला सांगितले होते. त्या नोकरानं आम्हाला हरतऱ्हेनं खूष ठेवायचा प्रयत्न केला. त्यानं आम्हाला कॉफी करून दिली; ती अगदीच पांचट होती, पण उन्हामध्ये ती घेताना खूप बरं वाटलं. एक तासाहून जास्त वेळ वाट पाहिल्यावर समोरून मोठी पोलीस व्हॅन येताना दिसली. जर्मन पद्धतीचा गणवेश घातलेले सहा पोलीस त्यात होते. मागे एका उघड्या गाडीतून पुढे पोलीस ड्रायव्हर आणि मागील बाजूस तीन सद्‌गृहस्थ बसलेले असे आले; त्यातील एक डॉ. नाल होता.

सर्वजण खाली उतरले. एक धर्मोपदेशकासारखा दिसणारा लहानसर माणूस आम्हाला उद्देशून म्हणाला, 'मी क्युराकाओ बेटाच्या सुरक्षा विभागाचा मुख्य अधिकारी आहे. मी तुम्हाला अटक करीत आहे. या बेटावर आल्यापासून तुम्ही काही गुन्हा केला आहे का? केला असल्यास कोणता? आणि तुमच्यातील कोणी?'

'महाशय, आम्ही पळून आलेले कैदी आहोत. आम्ही त्रिनिदादहून येत असताना काही तासांपूर्वीच तुमच्या खडकांवर आदळून आमची नौका नष्ट झाली आहे. आमच्या छोट्या तुकडीचा मी प्रमुख आहे; तुम्हाला मी खात्रीशीरपणे सांगतो की आमच्यापैकी कोणीही अगदी क्षुल्लकसुद्धा गुन्हा केलेला नाही.'

तो प्रमुख डॉ. नालकडे वळला आणि डचमध्ये बडबडला. तो बोलत असतानाच एकजण धापा टाकीत सायकलवरून तिथे हजर झाला. तो मोठमोठ्याने आणि वेगात बोलू लागला; कधी डॉ. नालशी, कधी पोलिसांशी.

'डॉक्टरसाहेब,' मी विचारलं, 'आम्ही चोर आहोत असं या माणसांना तुम्ही का सांगितलंत?'

'कारण तुम्हाला भेटण्यापूर्वी यानं मला सांगितलं की, निवडुंगामागून तो तुमच्यावर लक्ष ठेवून होता आणि त्यानं तुम्हाला घरात शिरताना पाहिलं. पुन्हा बाहेर येतानाही पाहिलं. तो माझा नोकर आहे. माझ्या काही गाढवांवर तो लक्ष पुरवतो.'

'तुमच्या घरात नुसतं शिरलो म्हणून आम्हाला चोर ठरवलं? या तुमच्या बोलण्यात काही तथ्य आहे का? आम्ही आत जाऊन फक्त पाणी प्यायलो—त्याला तुम्ही चोरी म्हणाल का?'

'आणि फ्लॉरिन्सच्या पिशवीचं काय?'

'हो. मी पिशवी उघडली होती खरी; त्याची दोरीही चुकून तुटली. पण मी इथली नाणी बघायच्या कुतुहलानंच तसं केलं. त्यावरून आम्ही कोणत्या देशात आलो आहोत ते समजलं. नंतर मी पुन्हा सगळी नाणी त्यात घालून पिशवी तिथल्या तिथे ठेवून दिली.'

पोलीस प्रमुखानं माझ्याकडे रोखून पाहिलं आणि त्या सायकलवरून येणाऱ्या व्यक्तीकडे वळून तो रागारागानं बोलू लागला. डॉ. नालनं तोंड उघडण्याचा प्रयत्न केला, पण प्रमुखानं त्याला गप्प केलं. नंतर त्या लबाड माणसाला मागच्या उघड्या गाडीत ड्रायव्हर शेजारी बसायला लावलं आणि मागे तो स्वतः दोन पोलिसांसह बसला. गाडी वेगात निघून गेली. डॉ. नाल आणि त्याच्याबरोबर आलेला दुसरा माणूस यांच्यासह आम्ही सर्वांनी घरात प्रवेश केला.

'मला थोडं स्पष्ट करू द्या,' तो म्हणाला, 'त्या माणसानं मला सांगितलं की पैशाची पिशवी नाहीशी झाली आहे. तुमची तपासणी घेण्यापूर्वी पोलिस प्रमुखाला त्याच्या बोलण्याची शंका आली म्हणून त्याला त्यानं बरेच प्रश्न विचारले. तो गडबडलाच. तुम्ही जर निर्दोष असाल तर झालं त्याबद्दल मला माफ करा, पण त्यात माझा काही दोष नव्हता.'

पंधरा मिनिटांच्या आत ती गाडी परत आली. प्रमुख मला म्हणाला, 'तुमचं म्हणणं खरं ठरलं. तो माणूस धडधडीत खोटं बोलत होता. तुम्हाला निष्कारण बदनाम केल्याबद्दल त्याला योग्य ती शिक्षा होईलच.' दरम्यान त्या माणसाला पोलिस व्हॅनमध्ये चढवण्यात आलं, आमच्या बरोबरचे पाचजणही त्यात बसले. मी व्हॅनकडे जाणार इतक्यात पोलिस प्रमुखानं मला हातानं ओढलं आणि तो म्हणाला, 'माझ्या गाडीत ड्रायव्हर शेजारी बैस.' आम्ही व्हॅनच्या पुढे वेगाने निघालो आणि क्षणार्धात ती आम्हाला दिसेनाशी झाली.

योग्य रस्ते घेत घेत आम्ही एका डच शहरात येऊन पोचलो. डच घरे वैशिष्ट्यपूर्ण होती. शहर अत्यंत स्वच्छ दिसत होतं आणि बहुतेक लोकं सायकलींवरून सगळ्या दिशांना फिरताना दिसत होते. आम्ही पोलिस चौकीत पोचलो. बरेच पोलिस असलेल्या मोठ्या कार्यालयात आम्ही प्रवेश केला, सर्वांनी शुभ्र पोशाख केला होता



पोलिसप्रमुखानं माझ्याकडे रोखून पाहिलं

आणि प्रत्येकाचं स्वतंत्र डेस्क होतं. आम्ही आतल्या खोलीत गेलो. ती वातानुकूलित असल्यानं थंड होती. एका खुर्चीवर भरपूर केस असलेला चाळीसच्या दरम्यानचा एक गुबगुबीत माणूस बसला होता. तो उभा राहिला आणि डच भाषेत बोलू लागला. तो आणि पोलिस मुख यांच्यात प्राथमिक चर्चा झाल्यावर, तो प्रमुख फ्रेंचमध्ये म्हणाला, 'हे क्युराकाओचे सर्वांत वरिष्ठ पोलिस अधिकारी आहेत. साहेब, हा सहाजणांच्या तुकडीचा नेता आहे. यांनाच आम्ही नुकतंच पकडलेलं आहे.'

'छान, तुम्हा होडी फुटलेल्या लोकांचं क्युराकाओमध्ये स्वागत असो. तुझं नाव काय ?'

'हेन्री.'

'अच्छा, तर हेन्री, त्या पिशवीच्या प्रकरणामुळे तुम्हाला बराच त्रास झाला, पण झालं ते एका दृष्टीनं ठीकच झालं. त्यामुळे तुम्ही प्रामाणिक आहात हे सिद्ध झालं. मी तुम्हाला एक उजेडाची खोली देतो. तिथं बिछानेही आहेत. म्हणजे तुम्हाला पुरेशी विश्रांती घेता येईल. तुमचा केस गव्हर्नरच्या अखत्यारीत आहे, तोच योग्य निर्णय घेईल. मी आणि हा अधिकारी तुमच्या बाजूनंच बोलू.' त्यानं हस्तांदोलन केलं आणि आम्ही बाहेर पडलो. डॉ. नालनं पुन्हा एकदा दिलगिरी व्यक्त केली आणि आमच्यासाठी त्याचं वजन वापरण्याचं आश्वासन दिलं. दोन तासानंतर आम्हाला एक मोठ्या वॉर्डमध्ये बंद करण्यात आलं. तिथे बारा बिछाने होते, एक मोठं टेबल आणि काही बाक. उघड्या खिडकीतून आम्ही एका पोलिसाला सिगारेट्स आणि काड्यापेट्या विकत घेऊन यायला सांगितलं. आमच्याजवळचे त्रिनिदाद डॉलर्स त्याच्यापुढे केले. त्यानं पैसेही घेतले नाहीत आणि तो जे काय बोलला त्यातलं एक अक्षरही आम्हाला समजलं नाही.

'तो बेटा अगदी प्रामाणिक नोकर दिसतो,' जोन्स म्हणाला, 'त्यानं अजूनही आपल्याला तंबाखू आणून दिला नाही.'

मी दार ठोठावणार एवढ्यात ते उघडलंच. एक हमालासारखा दिसणारा बुटका माणूस आत आला. त्याच्या अंगावर तुरुंगाचे कपडे आणि त्यावर क्रमांक होता. तो म्हणाला, 'पैसे, सिगारेट्स.' 'होय.' काही मिनिटांनंतर तो परत आला. येताना एका भांड्यातून उकळता कोकोही त्यानं आणला, सोबत पेलेही होते. आम्ही सर्वजण पेला पेला कोको प्यायलो.

दुपारी मला बोलावणं आलं आणि मी पुन्हा वरिष्ठाच्या कार्यालयात गेलो. 'गव्हर्नरनं मला सूचना दिली आहे की तुम्हाला तुरुंगाच्या परिसरात हिंडायला काही हरकत नाही. तुझ्या साथीदारांना सांगून ठेव की सुटकेचा प्रयत्न करू नका, कारण त्यामुळे तुम्हा सर्वांनाच गंभीर शिक्षा भोगावी लागेल. तू पुढारी असल्यामुळे तुला सकाळी आणि दुपारी दोन दोन तास बाहेर शहरात जाण्याची मोकळीक राहील. सकाळी दहा ते बारा, दुपारी तीन ते पाच. तुमच्याकडे पैसे आहेत ?'

'आहेत, फ्रेंच आणि इंग्लिश दोन्ही.'

'तू बाहेर पडताना एक साध्या वेषातील पोलिस तुझ्याबरोबर राहील.'

'ते आमच्याबाबत काय निर्णय घेतील ?'

'मला वाटतं ते तुम्हाला एक एक करून निरनिराळ्या देशांच्या टँकरवरून रवाना करतील. क्युराकाओमध्ये जगातील एक मोठा तेल शुद्धीकरण कारखाना आहे, तिथे व्हेनेझुएलाहून तेल येतं, त्यामुळे रोज निरनिराळ्या देशातून वीस ते पंचवीस टँकर्स इथे येतात. आणि तोच सर्वांत उत्तम मार्ग आहे, कारण तुम्ही अगदी विनासायास निरनिराळ्या ठिकाणी पोचाल.'

'साधारण कोणकोणते देश ? पनामा, कोस्टारिका, ग्वाटेमाला, मेक्सिको, कॅनडा, क्यूबा, अमेरिका की इंग्लिश कायदा चालू असलेले इतर देश ?'

'अशक्य, युरोपमध्ये तर अशक्यच आहे. तुम्ही काहीही काळजी करू नका. तुम्ही आमच्यावर विश्वास ठेवा, तुमचं आयुष्य नव्यानं सुरू व्हावं याकरता आम्ही शक्य ते सर्व चांगलंच करू.'

'धन्यवाद, साहेब,'

मी हा वृत्तांत माझ्या सहकाऱ्यांना जसाच्या तसा सांगितला. सगळ्यात इरसाल असलेल्या जोन्सनं विचारलं, 'तुला काय वाटतं, पॅपिलॉन ?'

'अजून तरी काही अंदाज येत नाही. कदाचित आपण सुटकेचा प्रयत्न न करता स्वस्थ बसावं म्हणून ते भुलथापाही देत असतील.'

'तुझं म्हणणं खरं असावं हीच मला भीती वाटते,' तो म्हणाला.

कारग्यूरेटचा मात्र त्यांच्या योजनेवर भलताच विश्वास बसला. तो खूष झाला. तो म्हणाला, 'पुन्हा होड्या नाहीत, पुन्हा धोका नाही, हे तरी आता नक्की झालं. आपण सर्वजण कोणत्या ना कोणत्या देशात टँकरवरून पोचू आणि तिथून नाहीसे होऊ.' लेब्लॉन्डचंही तेच मत पडलं.

'तुला काय वाटतं, मॅच्युरेट ?'

आणि तो मुलीपेक्षाही सुंदर चेहेरा असलेला एकोणीस वर्षांचा कोवळा पोर म्हणाला, 'तुम्हाला खरंच असं वाटतं काय की ते धूर्त लोक आपल्याला विनातक्रार येऊन सोडतील ? तो त्यांचा डाव आहे.

माझा तरी विश्वास नाही बसत. फारतर आपण एकएक करून गुपचुप त्या टँकरवरून निघून गेलो तर ते डोळेझाक करतील; त्यापेक्षा जास्त काही नाही. ते सुद्धा त्यांची डोकेदुखी आपोआप मिटेल म्हणून. हे आपलं माझं मत आहे. त्यांच्या एका शब्दावरही माझा विश्वास नाही.'

## नव्या तुरुंगातील जीवन

मी सकाळी थोडा थोडा वेळ खरेदीसाठी बाहेर जाऊन येत असे. इथे येऊन आठवडा लोटला तरी काहीच घडलं नाही. आता सगळ्यांनाच काळजी वाटू लागली. एका संध्याकाळी आम्हाला काही पोलिसांबरोबर तीन धर्मोपदेशक निरनिराळ्या कोठड्यांमध्ये जाताना दिसले. आमच्याजवळच्या एका कोठडीत ते बराच वेळ थांबले. तिथे बलात्काराच्या आरोपावरून एका निग्रोला डांबून ठेवलं होतं. ते आमच्या वॉर्डमध्ये येणारच असं आम्हाला वाटलं, म्हणून आम्ही सर्वजण आपापल्या बिछान्यावर स्वस्थ बसून राहिलो. खरोखर ते तिघेही आत आले. त्यांच्याबरोबर डॉ. नाल होता, पोलिस प्रमुख, शिवाय पांढऱ्या कपड्यातील एक व्यक्ति. तो बहुधा नेव्हीतील अधिकारी असावा.

'महाराज, हेच ते फ्रेंच लोक,' पोलीस प्रमुख फ्रेंचमध्ये म्हणाला. 'यांची वागणूक उत्कृष्ट आहे.'

'मी तुमचं अभिनंदन करतो. आपण या टेबलाभोवतीच्या बाकावर बसू या; म्हणजे आपल्याला मोकळेपणानं बोलता येईल.' सर्वजण खाली बसले. दाराजवळचं एक स्टूल आणून ते टेबलावर ठेवलं. त्यावर बिशप बसला, त्यामुळे त्याला सर्वजण स्पष्ट दिसू लागले. 'जवळ जवळ सर्व फ्रेंच लोक कॅथॉलिकच असतात : तुमच्यापैकी कोणाच्या बाबतीत तसं नाही का?' कोणीच हात वर केला नाही. मला वाटलं की मी सुद्धा स्वतःला कॅथॉलिकच मानावं. 'मित्रहो, मी सुद्धा फ्रेंच कुटुंबातीलच आहे. मी क्युराकाओचा बिशप आहे, इथे कॅथॉलिकापेक्षा प्रॉटेस्टंटच जास्त आहेत, पण इथले कॅथॉलिक त्यांच्या कर्तव्यपालनात जास्त तत्पर आणि उत्साही आहेत. बरं, सध्या तुमची काय परिस्थिती आहे?'

'आम्ही टँकरवरून आम्हाला एकेकाला पाठविण्याची वाट पाहातोय.'

'आतापर्यंत तसे कितीजण गेलेत?'

'अजून तरी एकही नाही.'

'ऑं? यावर तुम्हाला काय सांगायचंय्, अधिकारी महाशय? कृपया फ्रेंचमधून उत्तर देण्याची तसदी घ्या—तुम्हाला ती चांगली येते.'

'महाराज, गव्हर्नरचा खरोखरच तसा विचार आहे, की ज्या योगे या लोकांना मदतच होईल; पण स्पष्ट सांगायचं तर टँकर्सच्या एकाही कॅप्टननं यांना आपल्याबरोबर नेण्यास मान्यता कळवलेली नाही. त्याचं मुख्य कारण म्हणजे यांच्याजवळ पासपोर्ट नाहीत.

'मग आपण त्यातून मार्ग काढू. गव्हर्नर या सर्वांना खास पासपोर्ट नाही का देऊ शकणार? म्हणजे यांची अडचण तरी दूर होऊ शकेल.'

'ते मला सांगता येणार नाही. या विषयावर माझं त्याच्याशी बोलणं होऊ शकलं नाही.'

'परवा मी तुम्हा लोकांना प्रवचन देणार आहे. उद्या दुपारी तुम्हाला कन्फेशनसाठी यायला जमेल का? मी तुम्हाला असं वचन देतो मला तुमच्यासाठी जे जे करता येईल ते मी करीन, ज्या योगे तुमचं पापक्षालन होईल. या लोकांना उद्या दुपारी तीन वाजता कॅथेड्रलमध्ये पाठवणं तुम्हाला शक्य आहे?'

'हो.'

'त्यांना खाजगी मोटारीतून किंवा टॅक्सीमधून येऊ द्या.'

'मी स्वतः त्यांना घेऊन येईन, महाराज,' डॉ. नाल म्हणाला.

'आभारी आहे, मुलांनो. मी आता तुम्हाला काहीच आश्वासन देत नाही, पण एक सच्चा शब्द मात्र देतो—यापुढे मी तुम्हा लोकांच्या मदतीसाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करीन.'

डॉ. नालनं बिशपच्या अंगठीचं चुंबन घेतलं. कारग्युरेटनं त्याचं अनुकरण केलं. नंतर आम्ही सर्वांनी आमच्या ओठांनी त्या अंगठीला स्पर्श केला. बाहेर उभ्या असलेल्या गाडीपर्यंत जाऊन आम्ही त्यांना निरोप दिला.

दुसऱ्या दिवशी प्रत्येकजण बिशपजवळ कन्फेशन देण्यासाठी गेला. मी सर्वात शेवटी गेलो.

'ये, आत ये मुला, तुझ्या मोठ्यात मोठ्या पापापासून सुरुवात करू या.'

'फादर, मुळात एक गोष्ट म्हणजे मला दीक्षा मिळालेली नाही; पण फ्रान्समध्ये तुरुंगात असताना एका धर्मोपदेशकानं मला सांगितलं आहे की तसं असलं तरी प्रत्येकजण ईश्वराचाच पुत्र आहे.'

'त्याचं म्हणणं योग्यच आहे. अगदी खरं. आपण कन्फेशन बाजूला ठेवू या, तू तुझी कहाणी मला सांग.'

मी माझी जीवनकथा त्याला तपशीलवार सांगितली. त्यानं मध्ये यत्किंचितही अडथळा न आणता लक्षपूर्वक ती ऐकली. त्यानं माझे हात आपल्या हातात घेतले आणि तो माझ्या चेहऱ्याकडे बारकाईनं पाहात होता. जे काही प्रसंग शब्दात व्यक्त करताना मला संकोच वाटत होता, त्यावेळी तो भला माणूस आपले डोळे खाली वळवी. त्या साठ वर्षे वयाच्या बिशपचा चेहरा आणि डोळे हे बालकाप्रमाणे निरागस होते. त्यातून त्याच्या पवित्र आत्म्याचं दर्शन घडत होतं. तो माझ्याशी संथपणे पण कुजबुजल्यासारखा बोलू लागला. 'परमेश्वर तुम्हाला पूर्वीपेक्षा अधिक बळकट आणि उमद्या व्यक्तीमत्वाचे घडविण्यासाठी काही काही वेळा मुद्दामच संकटात लोटतो. तू क्षणभर विचार करून पाहा ना : तुला जर इतक्या संकटामधून जावं लागलं नसत तर आज तू ज्या मानसिक उंचीपर्यंत किंवा चिन्मय सत्त्याच्या जवळ पोचला आहेस तसं झालं असतं का? आणखी पुढे जाऊन मी म्हणेन की ते लोक, त्यांची यंत्रणा, ती भयानक वागणूक—किंबहुना ज्या ज्या गोष्टींमुळे तुझा अनन्वित छळ झाला त्या सर्वांचे तुझ्यावर उपकारच झाले आहेत. त्यांनी पूर्वीच्या तुझ्यामध्ये एक माणूस जिवंत केला. त्यामुळेच तुझ्यात आदरभाव, दया, सद्भावना या गुणांचा उदय झाला नाही का? त्याशिवाय सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्या सर्व अडचणींवर मात करण्यासाठी जबरदस्त इच्छाशक्ती निर्माण झाली. तिच्यामुळेच तुला चांगला माणूस बनण्याची प्रेरणा मिळाली. तुझ्यासारख्या माणसाला सूडाचे विचार शोभत नाहीत, किंवा तुला ज्यांच्यामुळे त्रास झाला

त्या सर्वांची परतफेड करणंही योग्य नाही. तू उलट लोकांना वाचविण्याचं काम केलं पाहिजेस. तुला कितीही योग्य वाटत असलं तरी तू कोणालाही दुखवता कामा नये.

'परमेश्वरानं तुझ्याबर अनेक वेळा कृपेचा वर्षाव केलेला आहे. तो म्हणत आला आहे की 'तू खटपट करीत राहा, झगडत राहा, मग मी तुला मदत करीन.' खरोखर त्यानं तुला सदासर्वकाळ मदतच केलेली आहे; इतकंच नाही तर तुझ्याकडून त्यानं इतरांनाही वाचविण्याचा प्रयत्न केला आहे, त्यांना स्वातंत्र्य मिळवून दिलं आहे. दुसरं म्हणजे, तुझ्या हातून गंभीर पाप कधीच घडलेलं नाही. तुझ्याहून वाईट वागणारी दोषी माणसं शेकडो आहेत, पण त्यांना तुझ्याइतक्या उच्च पातळीवर येण्याची संधीही अजिबात मिळत नाही.'

'थँक यू, फादर. तुम्ही मला फार चांगलं समजावून सांगितलंत. मी ते जन्मभर विसरू शकणार नाही. मला त्याचा सदैव उपयोग होत राहील.' असं म्हणून मी त्याच्या हातांचं चुंबन घेतलं.

'तू सर्व संकटांवर मात करून जीवनात पुन्हा उभा राहा. तू जाण्यापूर्वी तुला दीक्षा द्यावी असं मला वाटतं तुझी काय इच्छा आहे?'

'फादर, मला क्षणभर असंच राहू दे. माझ्या वडिलांनी मला धर्माशिवाय वाढवलं. त्यांचं अंःतकरण सोन्यासारखं होतं. माझी आई गेल्यावर त्यांनी तिची जागा घेतली. आई जे जे काय म्हणून करील ते करण्याचे त्यांनी आटोकाट प्रयत्न केले, आणि मला आईचं प्रेम दिलं. तेव्हा मला असं वाटतं की मी आता दीक्षा घेतली तर त्यांना एकप्रकारे धोका दिल्यासारखं होईल. काही वेळ मला अगदी स्वतंत्र राहू द्या, सर्व काही सुरळीत पार पडू द्या म्हणजे नंतर मी त्यांना पत्र लिहून विचारू शकेन की मी त्यांचं तत्त्वज्ञान सोडावं काय—मी ख्रिश्चन धर्माची दीक्षा त्यांना न विचारता घेऊ शकत नाही.'

'माझ्या सर्व लक्षात आलं, मुला, माझी खात्री आहे की ईश्वर तुझ्याबरोबर आहे. मी तुला आशीर्वाद देतो आणि देवाजवळ तुझं सदैव रक्षण करण्याविषयी प्रार्थना करतो.'

मी बाहेर आलो.

'बिशप महाराज अंत:करणाचे किती थोर आहेत ते तुला समजलं ना?' डॉ. नाल मला म्हणाला.

'अगदी खरं, त्यांचा अधिकार फार मोठा आहे. बरं आता तुमचा काय करायचा विचार आहे?

'मी गव्हर्नरला जाऊन विचारणार आहे की मला जप्त झालेल्या, चोरटी आयात करणाऱ्या होड्यांच्या लिलावात, एखादी होडी मिळेल काय? तू माझ्याबरोबर येऊन तुम्हाला उपयोगी पडू शकेल अशी होडी निवड. नंतर कपडे, साधनसामुग्री खरेदी करणं सोपंच आहे.'

बिशपच्या प्रवचनाचे दिवसापासून आम्हाला भेटायला येण्यासाठी लोकांचा ओघ सुरू झाला, विशेषत: संध्याकाळी सहाच्या सुमारास जास्तच. त्यांना आमची ओळख करून घ्यायची होती. प्रत्येकजण आमच्या बिछान्यावर अक्षरही न बोलता काही ना काही भेट वस्तू ठेवून जात असे. दुपारी दोन वाजता लहान लहान सिस्टर्स आमच्या साठी निरनिराळे पदार्थ स्वत: शिजवून आणीत. त्यांच्या प्रमुख



'बिशप महाराज अंत:करणाचे किती थोर आहेत?'

मदरनं हॉलंडला—तिच्या जन्म गावाला—पत्र टाकून विचारलं होतं की आम्हाला समुद्रातून पुन्हा रवाना करण्याऐवजी दुसरा काही मार्ग निवडण्याची शक्यता आहे काय? ती मदर चाळिशीच्या आतलीच होती. तिचे केस शुभ्र वस्त्रानं झाकलेले असले तरी निळे डोळे आणि सुरेख भुवया सर्वांवर आपला प्रभाव पाडीत असत. सर्व मुली आणि ती आमच्याजवळ बसून आम्हाला आमचा सुटकेचा पूर्वेतिहास विचारीत असत. आमचे कित्येक तास आनंदात जात. आमच्या कहाणीची अनेक पारायणं झाली, आणि एखादी बारिकसारिक गोष्ट मी सांगायची विसरलो की मदर ती माझ्या लगेच लक्षात आणून देई. 'हेन्री, इतकी घाई करू नकोस. ती होक्कांची गोष्ट गळली...आज तू मुंग्यांचा प्रसंग का विसरतो आहेस? तो फार महत्त्वाचा आहे, त्यामुळेच योगायोगानं तुझी आणि ब्रेटनची गाठ पडली नाही का?' मग मी पुन्हा ते सर्व सांगत असे; कारण आमचा दुर्दैवी भूतकाळ विसरायला लावण्याची अद्‌भुत शक्ती त्या हळुवार, सुखद क्षणांमध्ये होती.

मी एक पंचवीस फूट लांबीची सुंदर होडी पाहिली. भक्कम तळ, लांबच लांब डोलकाठी, विस्तृत शीड. ती खास चोरट्या वहातुकीसाठीच बनवलेली होती. ती अगदी सुसज्ज होती, परंतु त्यावर ठिकठिकाणी कस्टमनं मेणाची सिलं ठोकली होती. लिलाव सुरू झाला. भावाची चढती कमान होऊ लागली. सरतेशेवटी डॉ. नाल यांनी ती होडी सहा हजार एक फ्रँक्सना खरेदी केली.

पाच दिवसात आम्ही तयार झालो. होडीला नव्यानं रंग देण्यात आला. सर्व साठा काळजीपूर्वक ठेवण्यात आला. ही होडी म्हणजे राजाला साजेल अशीच देणगी होती. प्रत्येकाला एक एक सूटकेस मिळाली. त्यात नवीन कपडे भरले. बूट आणि इतर आवश्यक वस्तूही जमल्या. विशेष म्हणजे या होडीला जहाजासारखं एक छोटंसं डेकही होतं. त्यावर आमच्या सर्व गोष्टी ओळीनं मांडून

ठेवल्या. आम्ही सर्वजण निघण्याची वाट पाहू लागलो.

आम्ही किनारा पहाटेलाच सोडला. डॉक्टर आणि त्या प्रेमळ सिस्टर्स आम्हाला निरोप द्यायला आल्या होत्या. प्रवासाची सुरुवात तर झकास झाली. लवकरच कडकडीत ऊन पडलं. माझ्या लक्षात आलं की शिडाच्या बाजूला होडीचा समतोल ढळत होता. मी अत्यंत काळजीपूर्वक होडी चालविण्याचं ठरवलं. अंतर भराभर कापलं जात होतं, वेगाच्या दृष्टीनं ती चांगलीच होती, पण एकंदरीत ती 'हटवी' आणि 'भित्री'च होती. मी पश्चिमेला कूच केलं.

अखेर असं ठरलं होतं की विनिदादच्या तीन सहप्रवाशांना कोलंबियाचा किनारा लागल्यावर बेकायदेशीरपणेच खाली उतरवायचं. दूरच्या सफरीचा त्यांनी धसकाच घेतला होता. त्यांचा माझ्यावर पूर्ण विश्वास होता, पण हवामानाचा काय भरवसा? आणि आम्ही तुरुंगात जो हवामानाचा अंदाज ऐकत होतो त्यावरून खरंच थोड्या अवधीत तुफान वादळ होण्याची शक्यता होती. त्यांनी स्वतःविषयीचा निर्णय स्वतःच घेणं हे केव्हाही योग्य होतं. आम्ही असं ठरवलं की 'ग्वाजिरा' नावाच्या ओसाड आणि अपरिचित अशा बेटावर त्यांनी उतरावं. आम्ही मात्र पुढे ब्रिटीश हॉन्डरसच्या दिशेनं कूच करावं.

हवामान अत्युत्कृष्ट होतं आणि अष्टमीच्या चांदण्या रात्री त्या तिघांना जमिनीवर उतरवण्याचा कार्यक्रम अगदी सोपा होता. आम्ही सरळ कोलंबियाच्या किनाऱ्याकडे मोर्चा वळवला. मी नांगर टाकला आणि पाण्यात पाऊल टाकून त्यांना केव्हा किनाऱ्यावर सटकता येईल याचा अंदाज घेऊ लागलो. दुर्दैवानं तिथं पाणी बरंच खोल होतं, आम्हाला धोका पत्करून किनाऱ्यापासून अगदी पाच फुटांपर्यंत होडी न्यावी लागली. जवळ बरेच खडक होते. आम्ही हस्तांदोलन केलं. आपापली सूटकेस डोक्यावर घेऊन तिघेही बाहेर पडले आणि समुद्राच्या पाण्यात उभे राहिले. ते हळूहळू जमिनीच्या दिशेनं चालू लागले. आम्ही त्यांना जवळून आणि खेदानं पाहात होतो. ते आमचे काही काळ सोबती होते आणि आलेल्या संकटाला आम्ही एकत्र तोंड दिलं होतं, त्यांच्यामुळे आम्हाला केव्हाच त्रास झाला नव्हता. ते होडी सोडून जात होते ही फार वाईट गोष्ट होती. त्यांची मार्गक्रमणा चालू असताना वारा एकाएकी पडला. बापरे! नकाशात दाखवलेल्या खेड्यामधून आम्हाला कोणी पाहिलं तर–ते खेड मला वाटतं 'रिओ हॅचा' असावं. ते तर पोलिसांचं सगळ्यात जवळचं केंद्र असलेलं बंदर होतं. आपण अशी आशा करू की दुसरंच गाव असावं. आम्हाला वाटलं की इतकं किनाऱ्याच्या जवळ आपण उगाच आलो. कारण जवळच लाईट हाऊस होतं.




थांबा, थांबा...ते तिघेजण अदृश्य झाले, आपल्या हातरुमालानं त्यांनी अखेरचं 'गुडबाय' केलं. वाऱ्याची झुळुक. परमेश्वरा, या कोलंबियाच्या किनाऱ्यापासून दूर जाण्यासाठी थोडीशी वाऱ्याची झुळुक पाठव. कारण असं की तो देश म्हणजे आमच्या दृष्टीने एक मोठं प्रश्नचिन्हच होतं. कोणालाच माहित नव्हतं की तिथलं सरकार पळून आलेल्या कैद्यांना परत फ्रान्सच्या ताब्यात देतं का नाही ते. आम्हाला या अनोळखी कोलंबियापेक्षा दूरचं पण सुरक्षित ब्रिटिश हॉन्डरस अधिक पसंत होते. दुसऱ्या दिवशी दुपारी तीननंतर जरा वारा सुटला आणि आम्ही मार्गाला लागलो; जवळ जवळ दोन तासांच्या वर प्रवास केला. नंतर एकाएकी माणसांनी भरलेली एक लाँच दिसू लागली. तिचा रोख सरळ आमच्याकडेच होता आणि आम्ही थांबावं म्हणून ते हवेत गोळीबार करीत होते. त्याला न जुमानता मी दूर समुद्रात जाण्याचा प्रयत्न करू लागलो. छे! अशक्य! त्या गतिमान लाँचनं आम्हाला हा हा म्हणता गाठलंच. तरी त्यात दीड तास गेला म्हणा. दहा बंदुका आमच्यावर रोखल्या गेल्यामुळे नाईलाजास्तव आम्ही शरणागती पत्करली.

आम्हाला अटक करणारे ते सैनिक किंवा पोलीस म्हणा, साधारण एकसारखेच दिसत होते. त्यांच्या पायात कधीकाळी पांढरा रंग असलेल्या विजारी होत्या, शर्ट तर कधीच धुतलेले नसावेत; 'कॅप्टन'खेरीज सर्वजण अनवाणीच दिसत होते. त्यानं मात्र त्यातल्या त्यात बरे कपडे घातले होते आणि स्वच्छ. पण सगळ्यांच्या कमरेला काडतुसांचा पट्टा, उत्तम बंदुका आणि हातात खंजीर–म्हणजे ते पूर्ण सशस्त्र होते. ते ज्याला कॅप्टन म्हणत होते तो मिश्र जातीचा आणि खुनशी वाटत होता. त्याच्याजवळ एक भारी पिस्तूल होतं. ते स्पॅनिशमध्ये बोलत असल्यामुळे आम्हाला काहीच कळत नव्हतं. पण तरीही त्यांचे हावभाव, नजर आणि बोलण्याचा रोख हे मित्रत्वाचं खासच नव्हतं. अगदी कणमात्रही नव्हतं.

## 'रिओ हॅचा' तुरुंग

आम्ही किनाऱ्यापासून तुरुंगाकडे चालत गेलो; वाटेत एक खेडं लागलं, ते रिओ हॅचाच असणार. बाजूनं सहा आणि मागे तीन असं दांडगट लोक आमच्याबरोबर होते. त्यांच्या बंदुका अर्थातच आमच्यावर रोखलेल्या होत्या. याला काय मित्रत्वाचं स्वागत म्हणाल?

आम्ही तुरुंगाच्या आतील मोकळ्या जागेत जाऊन पोचलो. बाजूला छोटीशी भिंत होती. तिथे अंदाजे वीस कैदी उभे होते किंवा बसलेले होते. त्यांच्या अंगावर घाणेरडे कपडे होते आणि सर्वांच्या दाढ्या वाढलेल्या दिसत होत्या. त्यांच्या नजरेत शत्रुत्वाची भावना भरलेली होती. 'वामोस, वामोस.' आम्हाला सैनिकांच्या या म्हणण्याचा अर्थ कळला. 'इकडे या, इकडे या.' आम्हाला जलद चालणं कठीण होतं, कारण जोन्सचा पाय थोडा सुधारला तरी त्याला अद्याप प्लॅस्टर आणि लोखंडी बार अडकवलेला होताच. कॅप्टन बराच मागे पडला होता, त्यानं आम्हाला गाठलं. त्याच्या हातात आमचं होकायंत्र होतं. तो आमची बिस्किटं आणि चॉकलेट खात होता. आमच्या लगेच लक्षात आलं की आता आम्हाला कपडे काढावे लागणार. त्यात चूक झाली नाही. आम्हाला एका गलिच्छ खोलीत कोंडण्यात आलं. तिच्या खिडक्यांवर जाड गज होते. तिथे

जमिनीवर काही लाकडी ओंडके पडले होते, तिथेच एकप्रकारच्या लाकडी उशाही होत्या. पोलीस हलल्यावर एक कैदी खिडकीशी आला आणि म्हणाला, 'फ्रेंच लोक, फ्रेंच लोक !'

'तुला काय हवंय् ?'

'फ्रेंच लोक, वाईट, वाईट.'

'तुझ्या म्हणण्याचा अर्थ काय ? वाईट ?'

'पोलीस.'

'पोलीस ?'

'हो, पोलीस आहेत वाईट.'

आणि तो निघून गेला. रात्र झाली; खोलीत अगदी कमी प्रकाशाचा दिवा लागला. त्यामुळे उजेड पडत नव्हता म्हटलं तरी चालेल. आमच्या कानाभोवती डांस आवाज करीत होते आणि ते नाकात शिरत होते.

'एकंदरीत आपण चांगले घोळात सापडलो! त्या तिघांना किनाऱ्यावर सोडणं आपल्याला महागातच पडलं.'

'हे असं घडलं खरं. दोष कोणाचा हे कसं सांगणार. खरं म्हणजे वाराच याला कारणीभूत ठरला.'

'तू किनाऱ्याच्या अगदीच जवळ गेलास.' जोन्स म्हणाला.

'तू आता गप्प बसायला काय घेशील ? ही नावं ठेवायची वेळ नाही. यावेळी आपण एकमेकांना सांभाळून घेतलं पाहिजे. इथे पूर्वीपेक्षाही जास्त एकीची गरज आहे.'

'माफ कर. तुझं म्हणणं बरोबर आहे, पपी. दोष कोणाचाच नव्हता.'

ओह ! इतक्या झगड्यांनंतर आमच्या सुटकेची अखेर हीच ठरणार असेल तर दुर्दैवाचा कळसच म्हणावा लागेल. त्यांनी आमची झडती घेतली नव्हती. माझी चार्जर खिशात होती, ती मी पुन्हा गुप्त भागात सारली; जोन्सनंही तसंच केलं. आम्ही त्या फेकून न देण्याचा शहाणपणा दाखवला. काहीही झालं तरी त्या वॉटरप्रूफ डब्या होत्या, वाळगायला सोप्या आणि जागाही थोडी व्यापणाऱ्या. माझ्या घड्याळानुसार रात्रीचे आठ वाजले होते. त्यांनी आम्हाला थोडा थोडा उकडलेला भात आणून दिला. त्यात मीठ घातलेलं होतं. हीच आमची मेजवानी. 'ब्यूनास नॉचे.' 'त्यांना गुडनाईट म्हणायचं असेल,' मॅच्युरेट म्हणाला.

सकाळी सात वाजता बाहेरच्या मोकळ्या पटांगणात आम्ही गेलो. त्यांनी प्रत्येकाला लाकडी भांड्यातून खरोखर सुरेख कॉफी दिली. आठ वाजता कॅप्टन तिथे आला. मी होडीकडे जाऊन आमच्या वस्तू आणण्याची त्याला परवानगी मागितली. त्याला ते समजलं तरी नसावं किंवा त्यानं तसं ढोंग तरी केलं. त्याचा चेहरा मला जास्त जास्तच खुनशी वाटू लागला. कमरेला अडकवलेली बाटली त्यानं बाहेर काढली. बूच उघडून ती तोंडाला लावली, नंतर थुंकला आणि मग ती बाटली माझ्याकडे दिली. ही आम्ही पाहिलेली पहिली मित्रत्वाची निशाणी. मी ती बाटली घेतली आणि एक घोट घेतला. सुदैवानं घशाखाली काही थेंबच उतरल्यामुळे मी बचावलो. ते अत्यंत जळजळीत द्रव्य होतं, मिथिलमिश्रित स्पिरिटच. मी ते पटकन गिळलं आणि खोकू लागलो. त्यामुळे तो मिश्र जातीय माणूस खो खो करून मजेत हसला.

दहा वाजता गावातील काही लोक तिथे हजर झाले. पांढरा पोशाख आणि टाय. ते सहा–सातजण होते आणि ते तुरुंगातील एक इमारतीमध्ये शिरले. ते मुख्य कार्यालय असावं. आम्हाला बोलावणं आलं. ते आत खोलीमध्ये अर्धवर्तुळाकार बसले होते. त्यांच्या पाठीशी भिंतीवर एक भलं मोठं चित्र लावलेलं होतं—ते होतं कोलंबियाचे अध्यक्ष अल्फॉन्सो लोपेझ यांचं. त्यांच्यातील एकानं जोन्सला खाली बसवलं. तो जोन्सशी फ्रेंचमध्ये बोलला. आम्ही दोघं मात्र उभेच होतो. एका अर्ध्या काचेचा चष्मा लावलेला, टोकदार नाकाच्या किरकोळ इसमानं मला प्रश्न विचारण्यास आरंभ केला. दुभाषानं त्यातल्या एकाचंही स्पष्टीकरण न करता मला म्हटलं, 'आता जो माणूस बोलला आणि जो तुला प्रश्न विचारणार आहे तो रिओ हॅशा गावचा न्यायाधीश आहे. इतर लोकही मान्यवर आहेत, ते त्याचे मित्र आहेत. मी हाईतिन. या भागातील वीजपुरवठा मी सांभाळतो. मी नेहमी दुभाषाचं काम करतो. माझी अशी खात्री आहे की इथल्या काही लोकांना थोडंफार फ्रेंच येतं, पण ते तसं सांगत नाहीत. बहुधा न्यायाधीशसुद्धा.'

या आमच्या संभाषणामुळे न्यायाधीशमहाराज उतावीळ झाले आणि त्यांनी मध्येच स्पॅनिश भाषेत प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. हाईतिनच्या मध्यस्थीनं झालेली ती प्रश्नोत्तरे पुढीलप्रमाणे होती.

'तुम्ही फ्रेंच आहात ना ?'

'होय.'

'तुम्ही कोठून आलात ?'

'क्युराकाओ.'

'त्यापूर्वी ?'

'त्रिनिदाद.'

'आणि तत्पूर्वी ?'


'मार्टिनिक्.'

'तू खोटं बोलतोयस. एक आठवड्यापूर्वीच आम्हाला सूचना मिळाली की किनाऱ्यावर चांगली देखरेख ठेवा, कारण फ्रेंच गियानाहून पळालेले सहा जन्मठेपेचे कैदी तिथे अनधिकृतपणे उतरण्याची शक्यता आहे. आमच्या क्युराकाओमधील वकिलातीनं हे काम केलं.'




विमेदारांच्या हितासाठी ....

# तुमच्या विमा एजंटाचा पत्ता काळजीपूर्वक नोंदून ठेवा




## विमाविषयक सर्व अडचणीत तो तुम्हाला मोलाची मदत करील

तुमचा विमा एजंट हा तुमचा मित्र आहे. विमा-पॉलिसीच्या संपूर्ण मुदतीत तुम्हाला मदत करणं ही त्याची जबाबदारी आहे आणि अशी मदत मिळवणं हा तुमचा हक्कही आहे. त्याच्याशी नेहमी संपर्क साधा. आयुर्विम्याविषयीच्या प्रत्येक कामात प्रथम त्याचा सल्ला घ्या. तुम्हाला नवीन विमा घ्यावयाचा असल्यास तुम्हाला त्याची मदत होईल.

आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता विमेदारांकडून न झाल्यामुळे अनेक दाव्यांचे पैसे मिळण्यास विलंब होतो. याबाबतीत एजंटाचा सल्ला महत्त्वाचा आहे उदा. वारस नेमणे, वयाचा पुरावा देऊन पॉलिसीत नोंद घेणे, विमाहप्ते नियमितपणे भरणे, आणि पत्ता बदलल्याची नोंद तुमच्या पॉलिसीचा कारभार संभाळणाऱ्या कचेरीला देणे वगैरे.

**ज्या एजंटाकडून तुम्ही विमा घेतला असेल त्याचा सल्ला व साहाय्य सदैव घ्या. त्यामुळे तुमची पॉलिसी सुरक्षित व व्यवस्थित चालू राहील. जरूर तर एल.आय.सी.च्या नजिकच्या कचेरीशी संपर्क साधा.**

**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इन्डिया**

RADEUS/LIC/AS-6

'ठीक आहे. आम्ही जन्मठेपेचे पळालेले कैदी आहोत.'

'ज्याअर्थी फ्रान्ससारख्या उदार देशानं तुम्हाला दूर पाठवलं आणि कडक शिक्षा दिली, त्याअर्थी तुम्ही खरोखरच धोकेबाज माणसं असणार?'

'शक्य आहे.'

'चोरी का खून?'

'मनुष्यवध.'

'म्हणजे खूनच–ते दोन्ही एकच. तुम्ही सरावलेले खुनी आहात तर. बाकीचे तिघंजण कुठे आहेत?'

'ते क्युराकाओमध्येच राहिले.'

'तू पुन्हा खोटं सांगतो आहेस. तुम्ही त्यांना इथून पस्तीस मैलावर असलेल्या कॅस्टिलेट नावाच्या भागात उतरवलंत. सुदैवानं त्यांना लगेच अटक करण्यात आली आणि काही तासातच त्यांना इथे आणण्यात येईल. तुम्ही ती होडी चोरलीत का?'

'नाही, क्युराकाओच्या बिशपनं ती आम्हाला भेट म्हणून दिली.'

'ठीक आहे. तुमच्याबाबत काय निर्णय घ्यायचा हे गव्हर्नर ठरवीपर्यंत तुम्ही इथेच तुरुंगात राहाल. कोलंबिया भागात उतरणे आणि पुन्हा समुद्रात निघून जाण्याचा प्रयत्न करणे अशा आरोपाखाली मी तुला तीन महिन्यांची कैद ठोठावतो कारण तूच पुढारी आहेस. इतर दोघांना एकेक महिना कैद. तुम्ही वागणूक चांगली ठेवा–अन्यथा इथल्या शिक्षा फार कडक आहेत. तुला काही सांगायचं असेल तर सांग.'

'नाही. फक्त मला होडीवरील आमचं सामान इकडे आणण्याची परवानगी मिळावी.'

'ते सर्व कस्टम्सनं जप्त केलं आहे. प्रत्येकाला एक शर्ट-विजार, एक जाकिट आणि बुटांचा जोड हे तेवढं मिळेल. बाकीचं सारं जप्त झालेलं आहे, त्यामुळे आता गडबड करू नका. त्यावर काहीही उपाय नाही–तसा कायदाच आहे.'

सर्वजण बाहेरच्या मोकळ्या भागात आलो. घाणेरडे स्थानिक कैदी न्यायाधीशाच्या भोवती गोळा झाले आणि 'डॉक्टर, डॉक्टर!' म्हणून किंचाळू लागले. काहीही उत्तर न देता किंवा न थांबता स्वतःच्या मोठेपणाच्या तोऱ्यात तो त्यांना ढकलून मार्ग काढू लागला. ते सर्वजण तुरुंगाबाहेर पडले.

दुपारी तीन वाजता एका लॉरीतून आमचे तीन मित्र उगवले. त्यांच्याबरोबर सात-आठ सशस्त्र माणसं होती. ते आपापली सूटकेस हातात घेऊन खाली उतरले आणि मान खाली घालून चालू लागले. त्यांच्यासह आम्ही पुन्हा कोठडीत शिरलो.

'आमची धडधडीत चूकच झाली–त्याचे परिणाम तुम्हाला भोगावे लागले.' कारग्युरेट म्हणाला. 'आम्हाला आता बोलायला तोंडच उरलं नाही. पॅपिलॉन, आता तू मला बेलाशक ठार करू शकतोस, मी एक बोटसुद्धा वर उचलणार नाही. आम्ही काही माणसं नाहीत, चक्क बेअकली गाढवंच आहोत. समुद्राच्या भीतीमुळे आम्ही तसं वागलो. कोलंबिया आणि इथले लोक पाहिल्यानंतर तो समुद्रच अधिक परवडला असं म्हणायची पाळी आली आहे. वारा नसल्यामुळे ते तुम्हाला पकडू शकले का?'

'बरोबर, कारग्युरेट. माझा कोणालाही ठार करायचा विचार नाही: आपलं सगळ्यांचंच थोडं थोडं चुकलं. मी फक्त एवढंच करायला हवं होतं, की तुम्हाला खाली उतरवण्यास नकार देणे, म्हणजे असं काही घडलं नसतं.'

'तू खरोखर चांगला आहेस, पपी.'

'छे छे मी बरा आहे इतकंच.' मी त्यांना प्रश्नोत्तराविषयी सांगितलं. 'कदाचित गव्हर्नर आपल्याला सोडूनही देईल.'

'कोणी सांगावं, पण तसं धरून चालायला हरकत नाही, कारण त्या गोष्टीत सांगितल्याप्रमाणे आशा हीच तुम्हाला पुढे जाण्यास धीर देते.'

आमच्याबाबत त्या अर्ध-शिक्षित लोकांना काही निर्णय घेता येईना. ते काम त्यांच्या बुद्धीच्या कुवतीबाहेरचं होतं. आम्ही कोलंबियातच राहावं, की आम्हाला परत फ्रान्सच्या ताब्यात द्यावं? तिसरा पर्याय म्हणजे आमच्या होडीतून आम्हाला पुढे जाऊ द्यावं. फ्रान्सच्या ताब्यात देण्याचा निर्णय म्हणजे आमच्यावरील अन्यायाची परमावधी झाली असती. कारण काही झालं तरी आम्ही त्यांना यत्किंचितही त्रास दिला नव्हता किंवा त्यांच्या देशात आमच्या हातून क्षुल्लकही गुन्हा घडला नव्हता.

[क्रमशः]

---

मला एका गोष्टीचं राहून राहून आश्चर्य वाटायचं, लाली माझ्याशी मोकळेपणानं वागत असूनही ठराविक मर्यादा तिनं कधीच ओलांडली नाही. एका घरात आम्ही एकत्र राहायला लागल्यानंतरच तिनं आपलं सर्वस्व मला अर्पण केलं. मला फार खोलात जाऊन वर्णन करण्याची इच्छा नाही; पण तिनं केवळ अंतःप्रेरणेनं मला जास्तीत जास्त सुख दिलं. मी तिचे केस विंचरले की तिला फार आनंद होई. अशा वेळी तिचा चेहरा समाधानानं फुलून येई....

## पॅपिलॉनचा नवा संसार

**माणूस पुढील अंकी.**

# युवक कम्युनिस्ट नेता....चारशे एकरांचा मालक....!

जयप्रकाश चळवळ : पृष्ठ १३ वरून

चोंकात बालमुकुंद भोवती जमले. आणि त्याची टिंगल करू लागले. माकडाचा खेळ पाहाताना पोरे जशी आवाज वगैरे काढतात तसाच खेळ पोरांनी केला. खूप चिडवले शर्माला आणि शेवटा शर्मा चिडून निघून गेला.

आंदोलनाने हा निर्णयच घेतला आहे की कम्युनिस्टांना जे काही करायचे असेल ते करू द्या, त्यांना मारा बिरायचे नाही. येवढी सूट देऊनही त्यांचे नेते आज उजळ माथ्याने गावात फिरायलाही घाबरत असतात.

कम्युनिस्ट विरोधाच्या बातम्या केवळ वावड्या आहेत. अंशमात्र सत्यही त्यात नाही. उलट त्यांच्याच पायाखाली वाळू आता घसरते आहे या आंदोलनामुळे.

भोजपूर अनुमंडळात कम्युनिस्टांचे बळ होते. छोटे शेतकरी आणि शेतमजूर यांच्यात सतत संघर्ष तेवत ठेऊन कम्युनिस्ट आपली दुकानदारी चालवीत होते. आंदोलनाच्या सुरवातीच्याकाळात म्हणजे जुलै ऑगस्टपर्यंत येथून त्यांचा आंदोलनाला सक्रीय विरोध चालला होता. पण ऑगस्टमध्ये नवानगर, इटाहरी येथे आंदोलनाच्या समर्थकांनी शेतकरी व शेतमजुरांची एकजूट घडवून आणली. शेत मजुरी पैशा ऐवजी प्रत्यक्ष धान्याच्या स्वरुपात देण्याला आंदोलकांनी शेतकऱ्यांना भाग पाडल्यावर दोहोतली फूट संपली आणि आंदोलनाला असलेला विरोध मावळला आणि परिणामतः यावर पोसलेले कम्युनिस्टहि संपले. भोजपूर अनुमंडळातले ८।१० कार्यकर्ते (भाकपा) उघडपणे आंदोलनात भाग घेऊ लागले होते.

हा केवळ अपवादात्मक असा प्रसंग नाही. ज्यांचे जीवनच पार्टीवर अवलंबून आहे ते धंदेवाईक कम्युनिस्ट डांगे व जगन्नाथ सरकार (बिहार भा. क. प. चे चिटणीस) यांच्या सुरात सूर मिसळतात. पण पाटण्यातला एकादा रघुवंश सिंह सांगू लागतो की, 'माझी उभी हयात या पार्टीबरोबर गेली. मला पश्चात्ताप होतो आहे. इतके मूर्ख आणि नालायक आहेत आमचे नेते.' चाईबासात एकदा पाल नावाचा माणूसहि आपण कशाला अशा पार्टीबरोबर राहिलो असे म्हणत राहातो.

रक्सौलमधील केसरिया क्षेत्रातून कम्युनिस्ट आमदार निवडून गेलाय. ५।१० हजार माणसे पूर्वी हा आमदार आपल्या क्षेत्रातून मोर्चासाठी नेत असे. पण आता त्याला दहा माणसेही नेणे मुश्कील झाले आहे. त्याच्या अरेरावी वृत्तीमुळे त्याला एकदा पोरांनी चांगलेच बडवून काढले. भागलपूर–बांका क्षेत्रातही सी. पी. आय च्या आमदाराची पोरांनी चांगलीच पिटाई केली. ही मंडळी आता तोंडही दाखवीत नाहीत जनतेला,

## जमशेटपुरात

कामगार आघाडीवर त्यांची अवस्था दिवसेंदिवस वाईट होते आहे. रांची, जमशेटपूर, धनबाद, हजारीबाग या आसपासच्या कामगार क्षेत्रात त्यांचे थोडेफार बळ आहे. पण एकूण संघटित कामगारांच्यात त्यांची सभासदसंख्या हजारामध्ये पाच एवढीच आहे असे रांचीच्या एका कामगार नेत्याने आणि त्यांच्याच युनियनच्या वतीने खटले चालवणाऱ्या एका नामांकित वकिलाने सांगितले. एकतर आंदोलनाने त्यांची अवस्था फार वाईट करून टाकली आहे आणि दुसऱ्या बाजूला इतर कामगार संघटना आता जोरकसपणे हातपाय पसरीत आहेत. कोळशाच्या खाणींचे एक मोठे केंद्र बेरमो (जिल्हा गिरीडी) इथे कम्युनिस्टांची अनधिकृत युनियन होती. माऱ्यामाऱ्या–धमक्या या मार्गांनी त्यांनी आपली युनियन चालवली होती. पण जानेवारी महिन्याच्या सुमारास त्यांची सभासदसंख्या कमी होऊन आंदोलनाच्या समर्थकांच्या युनियनची सभासदसंख्या बरीच वाढल्याचे जाणवले. या बेरमो येथेच जे. पीं. नी सभा घेतली. सुमारे तीस ते चाळीस हजार कामगार सभेला होते. आदल्याच दिवशी सभेला विरोध कसा करायचा याची रंगीत तालीमही तेथल्या कम्युनिस्टांनी केली होती. पण सभेतला लोकांचा उत्साह जसजसा त्यांना दिसू लागला तसतसा एकेक जण काढता पाय घेऊ लागला होता.

जमशेटपुरात आता कम्युनिस्टांचे ५० तरी सदस्य असतील किंवा नाही याची शंका आहे. मागे एकदा कामगारांचा एक स्वयंस्फूर्त संप श्री. डांगे यांनी टाटांशी गुपचूप बोलणी करून मोडला होता याची आठवण जमशेटपूरच्या अनेक कामगारांना अजूनही असल्याचे जाणवले. वस्तुस्थिती अशी आहे की तेथला कम्युनिस्ट आमदार टाटांच्या मदतीनेच निवडून येत असतो!

नाही म्हणायला हजारीबाग जिल्ह्यात रामगढच्या आसपास त्यांचा प्रभाव अजूनही थोडाफार आहे.

बोकारो या प्रचंड औद्योगिक शहरातही त्यांना आता ओहोटी लागली आहे. जे. पीं. ची तेथे सुमारे साठ हजारांची सभा झाली आणि कामगारांनी आंदोलनाला थैली अर्पण केली. इन्स्पेक्शन बंगल्यावरच्या जे. पीं. च्या छोटचा बैठकीत कम्युनिस्ट युनियनचाही एक माणूस आला होता व त्याच्यावर कसा अन्याय झाला ते सांगत होता. आपल्या पूर्वीच्या सहप्रवाशाला–चंद्रजित यादव–आणून एक सभा घ्यावयाचा प्रयत्न बोकारोत झाला असताना लोकांनी त्याच्या सभेतच लोकनायक झिंदाबादच्या घोषणा देऊन सभा उधळून लावली होती.

कामगार क्षेत्रात उजव्या कम्युनिस्टांचा प्रभाव जो काही आहे तो केवळ आता गुंडगिरीवरच अवलंबून राहिला आहे. डांग्यांच्या दृष्टीने आता 'जगातल्या कामगारांनो एक व्हा' या घोषणेचा अर्थ 'जगातल्या गुंडांनो एक व्हा' असाच राहिलेला दिसतो!

कामगारात कम्युनिस्टांचे जे काही बळ उरले आहे ते सीटू या सी. पी. एम. च्या कामगार संघटनेचे आहे.

रांचीच्या एका आयटकच्या पुढाऱ्याने हळूच कबूल केले (खाजगीत) की त्यांच्या युनियनमध्येही जातीयवाद, परिवारवाद व भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणावर आहे.

बिहार आणि बंगालात आपण काही थोर कार्य केले आहे असा त्यांचा दावा चाललेला असतो. पण बिहार बंगालच्या भटकंतीनंतर माझा पूर्ण भ्रमनिरास झाला आहे.

बिहारात समाजवाद्यांच्या भांडणानंतर हळुहळू कम्युनिस्टांना आपले बळ वाढवता आले. पण सर्व राजकीय निर्णयांवर कब्जा मात्र बंगाली कम्युनिस्टांचाच राहिला.

बिहारात कम्युनिस्ट जातीयवादापासून दूर नाहीत. त्यांचे राजकारण जातीवरच अवलंबून आहे. जमीनदारांचे वर्चस्व कम्युनिस्टांवर बरेच आहे.

मधुबनी हा आपला बालेकिल्ला आहे असा दावा उजवे कम्युनिस्ट करतात. मधुबनी जिल्ह्यातल्या कम्युनिस्टांचा एक नेता पशुपतीनाथ मेहता : गाव सौरपूर : याची जमीन हजार एकरापेक्षा जास्त आहे. असेच आणखीही तीन चार जमीनदार मधुबनीत त्यांचे पुढारी आहेत. आपल्या जमीनीवरच्या कुळांनी गडबड करू नये म्हणून हे लोक कम्युनिस्ट झाले आहेत.

खसौल जिल्ह्यात जयनारायण राय हा युवक कमुनिस्ट नेता. चारशे एकराचा मालक. कुळांशी झगडा झाल्यावर त्यांच्यावर याने गोळ्या झाडल्या आणि त्यात दोन जण मारले गेले. याच खसौल जिल्ह्यातला एक कम्युनिस्ट आमदार स्मगलर आहे.

मुझफरपूर जिल्ह्यात मुसहरी प्रखंडात नक्षलवादाचे थैमान झाले होते. त्यात भाग घेतलेल्या काही नक्षलवाद्यांशी बातचित झाली. आधीच कम्युनिस्ट त्यातून नक्षलवादी म्हणजे किती पक्क्या इमानाचे असतील अशा कल्पना माझ्या स्वतःच्याही होत्या. पण मुसहरीत जे काही घडले ते हा भ्रम पूर्ण दूर करणारेच वाटले.

१९६४ नंतर कम्युनिस्टांची फाटाफूट झाली व सी. पी. एम. वेगळी झाली. ६७ च्या सुमाराला मुसहरीतली मंडळी सी. पी. एम. मध्ये दाखल झाली. त्यांच्या मते सी. पी. आय. बुर्झ्वापार्टी झाली होती. त्यानंतर १९७० मध्येही मंडळी सी. पी. एम. एल (मार्क्सिस्ट लेनिनिस्ट) झाली होती. म्हणजेच नक्षलवादी. नंतर १९७३ साली त्यांनी सी. पी. एम. एल. सोडली आणि सोशलिस्ट युनिटी सेंटरमध्ये प्रवेश केला. त्याला काय म्हणे एम. एल. वाले कोर्ट कचेऱ्यांच्या कामात काहीच मदत करत नव्हते आणि एका सेंटरवाल्याने गाडीत भेटल्यावर मदतीचे आश्वासन दिल्यावर हे लोक सेंटरमध्ये गेले. आता ते सेंटरमधून निघून सत्यनारायणाच्या नक्षलवादी गटात आहेत. या नक्षलवाद्यातही चारू मुझूमदार, सत्यनारायण आणि आणखी दोन तीन गट आहेत. मोठ्या जमीनदारांना आधी मारायचे की मोठ्या छोट्या सर्वांना एकदम मारायचे यावर फार मोठे 'तात्त्विक' मतभेद होत असतात आणि सुमारे वर्षाला एक या वेगाने गट बनत असतात.

## लक्ष खुर्चीवर, अत्याचार हे साधन

बंगाल ही कम्युनिस्टांची मक्का. बंगालमध्ये त्यांनी खूप काही केले आहे असा एक समज रुढ आहे पण तोही दुर्दैवाने खरा नाही. स्वातंत्र्योत्तरच नव्हे तर स्वातंत्र्यपूर्व काळापासूनचे बंगालमधले कम्युनिस्टांचे आंदोलन हिंसेचे आणि गुंडगिरीचे आंदोलन राहिले आहे. स्वातंत्र्य आंदोलनात एकेकाळी आघाडीवर असणाऱ्या व १८ वर्षे मंडालेमध्ये काढलेल्या दिनेश दासगुप्तांना त्यांचा अनुभव विचारला तर चिडून सांगतात, की त्या काळातही आम्हा लोकांना मारझोड करण्यापलीकडे कम्युनिस्टांनी काहीच केले नाही. बुद्धीचा उपयोग त्यांना माहीतच नाही, दांडगाईच जास्त. स्वातंत्र्यानंतर फाटाफूट होईपर्यंतच्या एकत्रित कम्युनिस्ट पार्टीने बंगालमधले राजकारण नामांकित गुंडांना हाताशी धरून मारझोडीच्या मार्गाने चालवले. निवडणुका–लोकशाही हे शब्द नावापुरतेच होते. गरिबांचे कल्याण वगैरे केवळ बोलण्यासाठीच, खरी धडपड चालली होती खुर्ची मिळवण्यासाठीच. सत्तेत जाण्या आधीच भ्रष्टाचाराला आणि गुंडगिरीला ते हपापले होते.

१९६२ च्या आक्रमणानंतर फाटाफूट झाली. त्याला आता तात्विक मुलामा दिला जातो. पण डाव्यांनी नेहरूंशी हातमिळवणी करून काही आताच्या सी. पी. एम.वाल्यांची नावे चीनचे हस्तक म्हणून सांगून त्यांना तुरुंगात अडकवले. ही सत्यस्थितीच मुळात पक्षातल्या फाटाफुटीला कारणीभूत होती. १९६४ नंतर गुंडांचे बळ सी. पी. एम.बरोबर गेले. संयुक्त सरकारमध्ये ज्योतीबसू हे सर्वात प्रभावशाली ठरले तेव्हा सी. पी. एम.वाल्यांनी गुंड आणि पोलिसांचे बळ वापरून एका बाजूला सी. पी. आय. आणि दुसऱ्या बाजूला काँग्रेस यांना बडवून काढले. संयुक्त सरकार कोसळल्यावर काँग्रेस व सी. पी. आय. यांची हात मिळवणी झाली आणि गुंडांचे बळ त्यांच्याकडे आले व त्यांनी मिळून सी. पी. एम.वाल्यांना बडवले, ठार मारले, तुरूंगात टाकले. संयुक्त सरकार झाल्यावरच सी. पी. अेम. मध्ये आणखी फाटाफूट झाली. नक्षलवादी निर्माण झाले. पूर्वी प्रतिगाम्यांविरुद्ध लढत असताना प्रतिगामी पोलीस विरोध करीत असत. पण 'आपलेच' सरकार आल्यावर सरकारने प्रतिगाम्यांविरुद्धच्या लढाईत (म्हणजे गुंडगिरीस) साथ द्यावी असे तथाकथित सक्रीय सी. पी. अेमवाल्यांना वाटत होते. पण दुर्दैवाने इतके क्रांतीकारी होण्याचे बसूंना जमले नाही, त्यांचे पोलीस हस्तक्षेप करीतच राहिले व त्यामुळे सी. पी. अेम मधून नक्षलवादी बाहेर पडले. हिंसा आणि अत्याचार हेच सामाजिक बदलाचे एकमेव साधन हा त्यांच्या तत्त्वज्ञानतला (भारतीय कम्युनिस्टांच्या) सुप्त धागा नक्षलवाद्यांनी मान्य करून टाकला, उघडपणे.

बंगालमध्ये ते सत्तेवर आले किंवा दूर गेले तरी राजकारण होत राहिले अत्याचाराचे आणि हिंसेचे. नक्षलवाद्यांतही शंभरात एखाद दुसराच तत्त्वज्ञान म्हणून पूर्णपणे नक्षलवादावर श्रद्धा असलेला. बाकीचे सर्व एकतर सराईत गुंड किंवा रोमँटिक कल्पना घेऊन आलेले मध्यमवर्गीय. ट्रॅफिक पोलिसासारखा दुर्बल माणूस त्यांचा वर्ग शत्रू म्हणून त्यांना मारून टाकायचे. एकाच घरात दोन जण नोकरी करीत असतील तर त्यांच्यापैकी एकाला मारून टाकायचे, कोणी जनसंघाचा म्हणून शत्रू, मग तो साधासुधा गरीब शेतकरी असला तरी चालेल. म्हणजे शेवटी यांचे म्हणणे ज्यांना मान्य नाही ते सर्व जगायला नालायक आणि प्रतिगामी; मग भले ते गरीब असोत, सामान्य असोत, कामगार असोत. नक्षलवाद्यांनी शस्त्रे उचलून त्यांना सरळ सरळ मारायची हिंमत दाखवली. सी. पी. अेम.– सी. पी. आय. वाल्यांनी हिंमत उघडपणे दाखवली नाही; तशी छुपेपणाने खून करणे किंवा तुरुंगाची वाट दाखवणे, हे मार्ग त्यांनी वापरले. पण मूलतः वृत्ती झुंडशाहीची, दडपशाहीचीच राहिली.

सी. पी. अेम., जे. पी. आंदोलनाला पाठिंबा देत आहे, पण त्यांचा पाठिंबा अत्यंत सावधगिरीचा आहे, हात राखूनच आहे येवढे सध्या नमूद करून ठेवावे लागेल. त्यांची आणि सी. पी. आय.ची मते आंदोलनाबाबत फारशी वेगळी नाहीत, डावपेचात फक्त फरक आहे. सी. पी. अेम.च्या बंगाल–बिहारातल्या नेत्यांशी बोलल्यावर हे झटकन ध्यानात येते.

असे हे कम्युनिस्ट किमान बिहार–बंगालमधले तरी. त्यांची संघटना, त्यांची इमानदारी त्यांची ताकद : सर्व खोटं आहे. अनेक गटांत ते विभागलेले आहेत. सर्वांचे लक्ष कायम खुर्चीवर. साधन अत्याचाराचे. भाषा मार्क्सवादाची.

कशी अपेक्षा ठेवायची त्यांच्याकडून बिहार आंदोलनाला पाठिंबा मिळण्याची ? त्यांना कुठाय नीतीमत्तेची चाड ? त्यांना कुठाय खऱ्याखोट्याची चाड ? त्यांना कुठाय गरिबाची खरी कणव ?

□ □

# जीतेंद्र

## एक बेचारा....

उडतो पण पक्षी नाही
वाटेल तितका लवचिक, पण रबर नाही
झाडामागे दडतो पण चंद्र नाही
गोल गोल फिरतो
तो कोण ?

–अशा धर्तीवर एखादं फिल्मी कोडं घातलं, तर काही वर्षांपूर्वी त्याचा एकमुखी जवाब आला असता–जीतेंद्र.
कोणतीही गोष्ट करायला हा अक्षरशः एका पायावर तयार असायचा. (दुसरा पाय बहुधा हिरॉइनच्या पायात अडकलेला असायचा नाहीतर तालावर नाचण्यात गुंतलेला असायचा. ताल अर्थात स्वतःचा–आणि तोल सोडून दिलेला–सर्वार्थी !) अष्टावधान इतकं, की एका वेळी गाणं म्हणणं, नायिकेबरोबर पळापळ करणं आणि धावणं या साऱ्या गोष्टी जीतेंद्र सफाइनं जमवायचा. झाडावरून जमिनीवर आणि जमिनीवरून पुन्हा झाडावर अशी हनुमंताला लाजवणारी सत्राणे उड्डाणे ! करावीत जीतेंद्रनंच. (आठवा : ' फर्ज ' आणि ' मस्तबहारों का मैं आशिक 'सारखी त्यातली गाणी !) ' सोनेकी लंका ' या सिनेमासाठी जितेंद्रला घेण्यात आलं तेव्हा एका रसिकाला प्रश्न पडला होता–शेपटीला आग लावून लंका जाळण्याचं काम तर यात बापड्या जीतेंद्रवर सोपवलं जाणार नाही ? विहिरीच्या निसरड्या काठावर अशा सहजपणे हा नायिकेशी लगट करायचा, की त्या चपळाईपुढे सर्पराजानं लाजावं. (आठवण्याचं धाडस होत असेल तर आठवा ' जवाब 'मधलं ' किस कारण जोगन जोग लिया ' हे गाणं) ' मनोजवम् मारुततुल्य वेगम् । धावणारा जीतेंद्र संगीत कबड्डी खेळायचा (' हमजोली ') किंवा ' तेरी टांग तोडू ' ही प्रतिज्ञा चाबकाच्या फटक्यांच्या तालावर हसत खेळत–नव्हे नव्हे, नाचत बागडत खलनायकावर अमलात आणायचा, यात आश्चर्य करण्यासारखं ते काय होतं ? जीतेंद्र मुळी माणसाचा पूर्वज कोण या समस्येची सक्रीय उकल करण्यातच गढला होता जणू. घुसळणुक, बस फुगडी, लचक नृत्य–काही म्हणता काही त्यानं शिल्लक ठेवलं नाही या शोधाच्या कामी.

हिंदी रजतपटावरचा पहिला जेम्स बाँड ह्या बिरुदाची झूल जीतेंद्रच्या या नाच कामाला घातली गेली. वास्तविक विदेशी जेम्स बाँडहून आमच्या या देशी बाँडची कृत्यं अधिक सुरस होती. जीतेंद्र एकुलत्या एका गाण्यात अनेक कसरती करीत असेच; शिवाय प्रत्येक कडव्याला नवा पोशाख घालून येत असे. अर्थात कृतघ्न समीक्षकांनी त्याची कदर केली नाहीच. कुणी म्हणे, ' एक पठार घेतात आणि जीतेंद्रला त्यावर सोडून देतात. कर काय करायचं ते. तर आणखी कुणी ' अंजाना 'सारख्या दुसऱ्या नटाच्या सिनेमाचं परीक्षण लिहितानाही जीतेंद्रला तराटणी देऊन जाई की, ' रस्त्यावरचा कुत्रा आणि जीतेंद्र लाजावेत असा यात राजेंद्र कुमार नाचला आहे ! '


' फर्ज 'पासून तो परवापरवाच्या ' कारवा ' आणि ' जैसे को तैसा 'पर्यंत जीतेंद्र देहभान विसरून या नृत्य–साधनेत रमला होता. हा आपल्या पोटावर पाय आणणार, अशी भीती हेलन आणि यच्चयावत नर्तकींच्या मनात शंका निर्माण व्हावी इतका रमला होता. याबाबत अशक्य हा शब्दच त्याच्या कोशात नव्हता म्हणाना.

कपूर नामक एका जव्हेऱ्याचा हा रवी नामक मुलगा एके दिवशी ' राजकमलमध्ये जातो काय, सिनेमात काम देण्याविषयी साक्षात चित्रपतींची आळवणी करतो काय अन् ती मानली जाते काय ! जेम्स बाँडच्या आयुष्यातच शोभावे असे चमत्कार. अर्थात शांतारामनी जीतेंद्रला पहिलं काम दिलं ते ' एक्स्ट्रा ' म्हणूनच. ' सेहरा 'मध्ये. (ज्याचा उल्लेख लोक पुढे ' सहारा ' वाळवंटाच्या नावे करू लागले !) मग ' गीत गाया पत्थरोंने 'मध्ये रवी कपूर सरळ नायक म्हणूनच लोकांच्या भेटीला आला. जीतेंद्र हे त्याचं नामकरण करण्यात आलं होतं. तरुण शिल्पकार म्हणून जीतेंद्र त्या सिनेमात निभावून गेला खरा. नंतर आला ' बूंद जो बन गयी माती– सॉरी, मोती ' (तेंडुलकरांनी एवढी उसनवारी क्षम्य मानावी ही विनंती.) या दुसऱ्या सिनेमात जीतेंद्र चक्क शाळामास्तर बनून आला. त्याच्या आजवरच्या पन्नास भूमिकामध्ये खऱ्या अर्थी विनोदी भूमिका एकही नाही. ती उणीव वास्तविक जीतेंद्रनं ' बूंद जो बन गये मोती 'मध्ये भरून काढली आहे. (आपल्या काही नावडत्या मास्तरावर दैवानं घेतलेला हा सूड बाकी एकेकदा सुखद वाटतो. असो.)

शम्मी कपूरच्या पावलावर पाऊल अक्षरशः ठेवून जीतेंद्रनं रांगड्या प्रेमिकांचा नवा अवतार पडद्यावर सुरू केला. नट म्हणून पसंत पडावं असं जीतेंद्रमध्ये काय आहे, हा संशोधनाचा विषय ठरेल. वाणी, नजर, मुद्राभिनय, हे सारं सोडून द्या, पण रूपाच्या बाजूनं म्हणावं तरी जीतेंद्र, धर्मेंद्र, शशी कपूर वा देव आनंद यांच्या मानानं डावा वाटतो. तारुण्य हाच जीतेंद्रचा एकमेव ' ॲसेट ' ठरला. थोडक्यात आणि स्पष्ट

पृष्ठ ३३ वर





# झिलमिल सितारे

अरुणा अंतरकर

## जीतेंद्र


राजेशच्या पडद्यावरच्या आक्रमणाने
जीतेंद्र जमिनीवर आला.
आणि
जंपींग जीतेंद्र
डान्सिंग स्टार
भारतीय जेम्स बॉंड जीतेंद्र
आपल्या नृत्यसमाधीतून जागा होवून
'परिचय' मध्ये प्रथमच दोन पायावर
सरळ उभा राहिला.






परिचयने नव्या जीतेंद्रची
प्रेक्षकांना ओळख झाली.
त्यालाही ती पटली. जीतेंद्र
मग त्याच प्रकारच्या
गंमीर भूमिकेंची मागणी करू लागला.

नुकत्याच प्रकाशित झालेल्या
दुल्हनमध्ये तो एका डॉक्टरच्या
भूमिकेत आला आहे.
साथीला आहेत अशोककुमार
आणि हेमामालिनी







जीतेंद्रच्या बाबतीत
मिशी आणि यश यांचं काही नातं आहे कां ?
'परिचय' मध्ये गुलजारच्या आग्रहासाठी
त्याने मिशी ठेवली.
ती लाभदायक ठरली.
पाहू आता 'दुल्हन' आणि 'खुशबु' ची मिशी त्याला
हात देते कां ?

# जीतेंद्र : एक बेचारा

बोलायचं तर लीना चंदावरकर, रेखा वगैरे– सारख्या नटी आणि जीतेंद्रसारखे नट यांची श्रेणी भिन्न ठरणार नाही.

एक होतं– दिलीपकुमार–राजकपूरसह शम्मी कपूर आणि राजेंद्रकुमार हे नट त्या काळी अती प्रौढ वाटू लागले होते. प्रेक्षकांना जीतेंद्रचा तरुण चेहरा त्यामुळे मानवला. निर्मात्यांना जीतेंद्र उपयुक्त वाटू लागला. साहाजिकच जीतेंद्र ' ज्युबिली स्टार 'देखील ठरला.

अर्थात ही सारी राजेश खन्नाचा उदय होण्यापूर्वीची कथा. राजेशच्या रूपानं, सर्व थरातल्या सर्व वयाच्या प्रेक्षकांना खेचून घेणारा,विश्वसनीय अभिनेता आणि झगझगीत स्टार याचा वशीकरण ताईत निर्मात्यांना सापडला. राजेशच्या लाटेनं जीतेंद्रसारख्या अनेकांना मागच्या रांगेत नेऊन बसवलं. राजेशच्या जोडीला संजीव कुमार आणि अमिताभ बच्चनसारखे खंदे नट येऊन बसले. वादळात सापडलेल्या पानासारखी जीतेंद्रची अवस्था झाली.

पहिल्याच चित्रपटापासून प्रसिद्धीचा निर्वेध मुलायम मार्ग चालू लागलेल्या जीतेंद्रपुढे प्रथमच संघर्ष उभा राहिला. सत्तर एकाहत्तर साल त्याला चांगलंच चकवून गेलं. त्याच्या चार चित्रपटांची– औलाद, बनफूल, कठपुतली, एक नारी– एक ब्रह्मचारी– दशा इतकी केविलवाणी झाली की, त्याच्या पाचव्या चित्रपटाच्या नावे तो सिनेसृष्टीत ओळखला जाऊ लागला.– ' एक बेचारा '

या अपयशाची चव जीतेंद्रला जमिनीवर घेऊन आली. नृत्यसमाधीतून जागं होऊन त्यानं आपल्या भवितव्याचा गंभीरपणे विचार केला. ' जंपिंग जीतेंद्र ', ' डान्सिंग स्टार ' ही आपली इमेज बदलली पाहिजे, असं त्याला तीव्रपणे वाटू लागलं होतं. शिवाय आता आर्थिक स्थैर्य आलं होतं. आता काहीतरी मिळवण्याची इच्छा जागी झाली होती. दर्दी रसिक अद्याप आपल्याला नट म्हणून ओळखीत नाहीत, ही टोचणी मनाला लागली होती. आता नव्या वाटेनं चाललं तरच भविष्यकाळ दिसणार होता. मग जीतेंद्रनं गुलजार या कसबी दिग्दर्शकाला हाताशी धरलं, आणि ' परिचय 'च्या स्वरुपात एक सुखद आश्चर्य प्रेक्षकांच्या भेटीला आलं.

' परिचय ' हा जितेंद्रचा पतितोद्धार ठरला. जीतेन्द्रची त्यानं प्रेक्षकांशी नव्यानं ओळख करून दिली. ' जीतेंद्रला इतक्या वर्षात, दोन पायावर सरळ उभं राहिल्याचं पाहिलं, आता सत्यनारायणच घालायला हवा ' अशी थट्टा करीत का होईना, पण ' परिचय 'च्या जीतेंद्रला प्रेक्षकांनी आपलं म्हटलं. गुलजारनं जीतेंद्रचा विश्वास राखला होता. ' परिचय ' हे जीतेंद्रच्या अभिनयाचं शिखर नव्हे; पण आजवरची ती त्याची उत्तम भूमिका ठरेल निःसंशय. त्यानं मनापासून ती भूमिका केली आहे एवढं तिथं निश्चित जाणवत होतं. गुलजारनं ती व्यक्तीरेखा रंगवली देखील आहे मोठी छान. कोणताही नट त्या भूमिकेनं लोकप्रिय व्हावा अशीच भूमिका आहे ती. जीतेंद्र या व्यक्तीरेखेत–(पुन्हा किंचित्काळ का होईना, इथेही तो शिक्षक बनला आहे)–बराच विश्वसनीय वाटला.

एक सुरेख प्रसंग आठवतो. त्या पेढीवरच्या जुन्या कारकुनाला काढून तिथं जीतेंद्रची नेमणूक होणार असते, जीतेंद्रला कामाची रूपरेखा समजावून सांगतांना तो वृद्ध इमानी नोकर पुनःपुन्हा सांगत राहातो, ' मालकांनो मला काढून टाकलं नाही काही. मीच म्हातारा झालो आता. ' त्याच्या त्या पुनःपुन्हा सांगण्यात त्याची अगतिकता, लाचारी स्पष्ट होते. रडवेला झालेला त्याचा तो वृद्ध, फाटका स्वर सारं काही सांगून जातो. तशी माणुसकी जागी असलेल्या या तरुणाचे डोळे पाणावतात. चष्मा राहिल्याची की तशीच काहीशी किरकोळ सबब सांगून तो तिथून काढता पाय घेतो–पुन्हा कधीच न परतण्यासाठी. काळजाला स्पर्शून जाणाऱ्या या क्षणात जीतेंद्रनं आपला अभिनयाचा आवश्यक तो वाटा निर्दोषपणे उचलला होता. ' परिचय ' नं जीतेंद्रला नट म्हणून मान्यता मिळवून दिली. पण पुन्हा चांगली भूमिका आणि चांगला दिग्दर्शक मिळवण्यासाठी जीतेंद्राला स्वतःलाच निर्माता बनावं लागतं, ही गोष्ट काय सांगते ?—हेच की, अद्याप अभिनेता म्हणून चांगल्या–निर्माते-दिग्दर्शकांचा–विश्वास त्याला संपादन करायचा आहे. स्वतःच्याच चित्रसंस्थेतर्फे तयार होणाऱ्या ' खुशबू ' मध्ये जीतेंद्र डॉक्टरची भूमिका सजवतो आहे. दिग्दर्शन पुन्हा गुलजारच्या हाती आहे. पुन्हा एकदा ' परिचय ' ची आवृत्ति घडते का पहायचं. याच दरम्यान प्रकाशित होणाऱ्या 'दुल्हन' मध्येही जीतेंद्रनं डॉक्टरचीच भूमिका केली आहे. डबल रोलची, प्रत्येक नटाला हवीहवीशी वाटणारी संधी या भूमिकेनं जीतेंद्रला दिली आहे. गत वर्षी 'बिदाई 'नं सुद्धा जीतेंद्रला चांगला हात दिला. आज पुन्हा एकदा त्याचं नाव ' सेलेबल स्टार 'च्या यादीत येऊन बसलं आहे.

एक वर्षाच्या चित्र संन्यासानंतर आज जीतेंद्र डझनभर चित्रांचा नायक आहे. त्यातलं एक ' संकोच ' हेच नाव उठून दिसतं. त्या चित्रपटाचा दिग्दर्शक आहे. ' कोरा कागज ' फेम अनिल गांगुली. बाकी ' कसली लोके कातिल, ' ' नालायक ', ' धर्मवीर ' ही शीर्षकं आणि मनमोहन देसाई, शिबू मित्र ही दिग्दर्शकांची नावं बोलकी आहेत. या चित्रपटांच्या स्वरुपाबद्दल वेगळं बोलायलाच हवं काय ? पण त्याबद्दल जीतेंद्रला दोष देण्यात अर्थ नाही. अखेर अभिनय हा देखील पोटापाण्याचा धंदा आहे. सिनेमा ही कला आहेच; पण व्यवसाय देखील आहे. इथे टिकून राहायचं तर अर्धा डझन व्यापारी चित्रपटांमागे एक चाकोरी बाहेरचा चित्रपट, या गणितानं नट भूमिका निवडतात. त्या दृष्टीनं निर्माता म्हणून, जीतेंद्रनं आशादायक कामगिरी बजावली आहे असच म्हणायला हवं. राजेश खन्नासारखा अत्यंत यशस्वी आणि अत्यंत श्रीमंत नट देखील स्वतः निर्माता बनतो तेव्हा ' रोटी ' सारखा संपूर्णतया बाजारी चित्रपट काढतो. निर्माता जीतेंद्र ' परिचय ' आणि ' खुशबू ' सारखो कथा-प्रधान चित्रं हाती घेतो, हे निश्चितच कौतुकास्पद आहे. 'मायादर्पण', 'दुविधा' या सारखे चित्रपट हे आपलं ध्येय नव्हे; चांगला व्यावसायिक सिनेमा आपण अधिक मानतो ' असं जीतेंद्र रोखठोक सांगतो. त्याच्यातला दक्ष जागरूक बिझनेसमन चारास एक याप्रमाणेच व्यावसायिक व चांगल्या भूमिकांची निवड करणार हे उघड आहे. ■

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### ८-३-७५ ते १४-३-७५

**राष्ट्रीय प्रश्नात शेख साहेबांना महत्त्व येणार !**

शेख अब्दुल्ला तब्बल २१ वर्षांनी काश्मीरचे मुख्यमंत्री झाले, हा पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या गूढ राजकीय कौशल्याचा नमुना आहे हे विरोधकांना व टीकाकारांना मान्य करावे लागणार असे दिसते. सिंह राशीच्या चंद्रावर शेखसाहेब मुख्यमंत्री पदावर आरूढ झाले आहेत. मंगळ ह्या सत्तेच्या कारक ग्रहाने त्यांना साथ दिली आहे व रवी देखील त्यांना अनुकूल आहे. म्हणूनच हे सत्ताग्रहण अगदी सहजसुलभ होऊ शकले. शेख अब्दुल्ला सत्तेवर आले व त्याचवेळी शस्त्ररूपाने पाकिस्तानला अमेरिकेचा आशीर्वाद लाभला आहे हा योगायोगच आहे. पाकिस्तान-भारत यांच्या द्वेषमूलक संबंधांचे मूळ काश्मीरच आहे. पाकिस्तानच्या शस्त्रसज्जतेला 'शेख अब्दुल्ला' हेच उत्तर इंदिराजींनी दिले आहे. हेच उत्तर पाकिस्तानच्या अधिक विघटनेची नांदी ठरणार आहे. इंदिराजी आणि जयप्रकाश यांच्यात सुसंवाद घडवण्याची शिष्टाई अब्दुल्लांनी केली तर आश्चर्य वाटू नये. महाराष्ट्रात मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण विरोधकांना जिंकणार आहेत.

**मेष : महत्त्वाच्या गाठीभेटी**

या आठवड्यात काही दिवस चांगलेच महत्त्वाचे ठरणार आहेत. बारावा गुरू स्वगृही बारावा आहे ही काही वाईट गोष्ट नाही. तुमचा खर्च फार होईल, पण तो पैसा धार्मिक कामासाठी, दानधर्मासाठी खर्च होईल. मंगल कार्यात तुम्हाला मान मिळणार आहे. मात्र हे मंगल कार्य केवळ तुमच्याच घरचे असेल असे नाही. रविवार, मंगळवार हाती सत्ता असलेल्या व्यक्तीची भेट होईल. त्यांच्यामुळे तुमचा भावी काळात फायदा होईल. गुरुवारी सूचक असे स्वप्न पडेल. त्यामुळे तुमच्या मनाची चलबिचल होईल. बुधवारी पैशाची कोणतीही कामे यशस्वी होतील. काही करार मदार करायला हरकत नाही. विवाहेच्छूंचे विवाह ठरविण्यासाठी पुष्कळच पायपीट करावी लागेल. तरुण मुलींनी प्रेमाच्या भानगडीत पडू नये. स्त्रियांनी नोकरीत लक्ष द्यावे. शुभराशी ६-७-८

**वृषभ : साहित्यिकांचा उत्कर्ष**

तुमची रास ही मुळातच कलागुणाची रास आहे. उत्तमर्णकी कलावंत व प्रतिभासंपन्न वाङ्मयसेवक याच राशीत जन्माला येतात असा अनुभव आहे. म्हणूनच शुक्र जरी गुरूचा मित्र नसला तरी तुमच्यापैकी जे कुणी साहित्यिक होण्याच्या मार्गावर असतील त्यांना या आठवड्यात अनुकूल अशी साथ मिळेल. कीर्ती व प्रतिष्ठा वाट्याला येईल. याच मार्गाने चार पैसे वाट्याला येतील. शनिवारी बेकारांची नोकरीची वणवण संपेल. चालू नोकरीत काही तरी पगारवाढ मिळेल. नवा असा कोणताच व्यवसाय चालू होणे जरा अशक्य वाटते. बुधवारी एखाद्या विद्वान व्यक्तीचा आशीर्वाद मिळेल. राजकारणात असणाऱ्यांनी जरा आजूबाजूस लक्ष ठेवावे. महिलांना माहेरची मदत मिळेल. भावाकडून वस्त्रे मिळतील. शुभराशी ३-७-८

**मिथुन : नोकरीत बदल**

दहावा गुरू व मंगळाची अनुकूलता या दोनच गोष्टी तुमच्या जीवनात प्रकाश निर्माण करायला पुरेशा आहेत. आता माघार नाही की अपयश नाही. यावेळी नोकरीत तर बरेच काही अकल्पित घडणार आहे. तुम्ही आपली बदली व्हावी अशी मनातून इच्छा करीत होतात ती संधी आता आली आहे. या वेळी योग्य ती वरिष्ठ व्यक्ती तुम्हाला आशीर्वाद देईल. अनेक दिवस रेंगाळत पडलेली तुमची धंदेविषयक योजना आता कार्यान्वित होऊ शकेल. अनेक क्षेत्रात तुमचा वचक व दबदबा निर्माण होईल. तुम्ही पोलीस व लष्करासारख्या क्षेत्रात असाल तर तुमच्या कर्तृत्वाला जवळजवळ आव्हानच मिळेल. तब्येतीला थोडे फार जपायला हवे. प्रवासाची इच्छा पुरी होणे कठीण. विवाहेच्छू तरुणींना उत्तम जोडीदार मिळेल. शुभराशी ५-६-१०

**कर्क : अध्यात्माची इच्छा**

साडेसातीचा विचार सोडून द्या व नव्या उमेदीने उद्योगाला लागा. संधी समोरच तुमची वाट पहात उभी रहाणार आहे. एका प्रसिद्ध मराठी लेखकाने म्हटले आहे की, 'संधी एकदाच येते. सारखे येतात ते घेणेकरी' याची जाणीव ठेवा. योग्य ती योजना तयार करा व कामाला लागा. वाचन, चिंतन यात तुमचा वेळ कसा जाईल हे कळणार सुद्धा नाही. या आठवड्याचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे ऐहिकात बुडून गेलेल्या तुमच्या मनाला अध्यात्माचा स्पर्श होणार आहे. इतर बाबतीत काही महत्त्वाच्या घटना तुमच्या जीवनात घडणार आहेत. सोमवार ते बुधवार एखादी व्यक्ती तुमच्या सहवासात येईल. पैसा व इतर कामे होण्यात काही अडचणी नाहीत. आर्थिक क्षेत्रात नोकरी मिळेल. महिलांना शैक्षणिक क्षेत्रात काम मिळेल. शुभ राशी २-६-७.

**सिंह : संघर्षातून यश**

तुमचा राशीस्वामी अयोग्य स्थानी आहे. तुमच्या संसारिक जीवनात चटकन एखादी अडचण निर्माण होऊ शकेल.पण या येणाऱ्या अडचणी तुम्ही पार करू शकाल व यश मिळवाल. या वेळच्या तुमच्या ग्रहांचे स्वरूपच असे आहे की, संघर्षातून यश मिळवावे लागेल. एकच अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे शनी अकरावा आहे व तो तुमचे आर्थिक जीवन समृद्ध करून देणार आहे. मी तुम्हाला असे सांगेन की, या वेळी तुम्ही लॉटरीचे तिकीट अवश्य काढा. यश मिळाल्याखेरीज रहाणार नाही. नोकरीत नेहमी तुम्हाला कामाचे श्रेय मिळत नाही. पण या वेळी तसे घडणार नाही. तुमचे श्रेय तुम्हाला मिळेलच. नोकरीदेखील कायम होईल. संसारात पूर्ण समाधान नसले तरी अडचणी निर्माण होणार नाहीत. महिलांनी वृद्ध स्त्रीपुरुषांच्या कलाने घ्यावे. शुभ राशी ६-९-१०.

**कन्या : मन प्रसन्न राहील**

गुरूचे सातव्या स्थानी मीन राशीत आगमन म्हणजे तुमच्या संसारात, वैवाहिक जीवनात प्रसन्नतेचा, सात्त्विकतेचा आणि सौजन्याचा एक साक्षात्कारच होय. गेल्या वर्षभरात तुमचा स्वभाव चिडखोर, तापट व संतापी बनला होता. घरात मुले, पतिपत्नी यांच्यात सारखी धुसपूस चालू होती. पण गुरूने या तुमच्या स्वभावावर सौजन्याचे गुलाबपाणी शिंपले आहे. त्यामुळे तुमचा स्वभाव नक्कीच बदलू लागेल. मित्रांनो, तुमच्यापैकी कुणी 'बोहल्या'वर उभे रहाण्याच्या विचारात असतील तर त्यांचे नक्कीच 'सावधान' होणार आहे आणि तुमच्यापैकी जे कुणी मनाने 'तरुण' आहेत ते प्रेमात पडणार आहेत. सोमवार, शुक्रवार हे दिवस अधिक महत्त्वाचे ठरतील. नोकरीत कामाचा ताण वाढणार आहे. पण त्रास फारसा होणार नाही. बेकारांना आता वणवणत रहावे लागणार नाही. त्यांना एखाद्या उद्योगात भागीदारी मिळेल वा नोकरी मिळेल. महिलावर्गाला मनःस्वास्थ्याचा प्रत्यय येईल. शुभ राशी ५-७-१२.

**तूळ : प्रगती चालूच राहील**

शुभयोगात असलेल्या गुरूने राश्यंतर केले म्हणून तुम्ही एवढे नाराज होण्याचे काय कारण आहे ? जोपर्यंत भाग्यस्थानी शनी आहे व हर्शल–शनीचा नवपंचम योग आहे तोपर्यंत तुमच्याबाबतीत कोणतीच उणीव निर्माण होणार नाही. फारतर तुमच्या शैक्षणिक कार्यात थोडीफार अडचण निर्माण होऊ शकेल. पण त्यामुळे नुकसान असे काहीच होणार नाही. या आठवड्यातील शनिवारी एखाद्या धार्मिक कार्यात तुम्हाला अनपेक्षित भाग घ्यावा लागेल. सोमवार ते गुरुवार नोकरीच्या बाबतीत प्रगतीकारक घटना घडू शकतील. एखादा सौंदर्यसाधनोत्पादनचा लहानसा धंदा सुरू होईल. त्यासाठी तुम्हाला भांडवल मिळेल. चालू उद्योगात अगर व्यापारात आशादायक परिस्थिती निर्माण होईल. विवाहविषयक बेत लांबणीवर पडण्याची शक्यता. महिलांना नोकरीत वरिष्ठ पदाची व पगाराची नोकरी मिळेल. शुभ राशी ४–८–९.

**वृश्चिक : सुख आणि स्वास्थ्य**

हर्शलच्या दुष्ट कारवायांची तुम्ही उगाच का बरे खंत बाळगता ? तो तुमचे कांहीही वाईट करणार नाही. कारण एकटा पांचवा गुरू त्याचे पारिपत्य करायला तयार आहे. गुरू पाचव्यास्थानी म्हणजे बुद्धीमत्तेला नवा प्रकाश. कल्पकतेला नवे आव्हान. व्यावसायिक जीवनात नव्या युगाची सुरुवातच होय. एका नव्या प्रमत्ततेच्या वातावरणावर मनाची उभारणी करू शकाल. अधिकारात अनपेक्षित वाढ, राजकारणात यशप्राप्ती, आर्थिक क्षेत्रात उत्साहजनक उलाढाल. असे काही तरी घडू शकेल. रविवारी विशेष काही करू नका. सोमवार, बुधवार नोकरी करणाऱ्यांना बदलीच्या जागी आपला जम बसवायला अनुकूलता लाभणार आहे. चार प्रतिष्ठित व्यक्ती बरोबर ओळखी होतील. महिलांना सरकारी नोकरीत सुखाची जागा मिळेल. शुभ राशी ५–६–१२

**धनु : स्वास्थ्य सुख गवसेल**

मनाला शांती मिळण्याच्या दृष्टीने व मनाला आशादायी वातावरणाचा स्पर्श होण्याच्या दृष्टीने चौथा गुरू पावले टाकीत आहे. गुरू हा सुखस्थानाचा अधिपतीही आहे. त्यामुळे आता तुम्ही आशावादी राहायला हरकत नाही. अनेक बाबतीत यापूर्वी निर्माण होत असलेल्या अडचणी आता कमी होत असल्याचा प्रत्यय येईल. या आठवड्यातील सोमवार, मंगळवार व शुक्रवार महत्त्वाचे आहेत हे लक्षात घेऊन पावले उचला. तुमच्यापैकी ज्यांची परिस्थिती चांगली असेल त्यांना बंगला, फ्लॅट वगैरे मिळण्यासाठी अनुकूलता आहे. भाडेकरू व घर मालक यांच्यात चालू असलेला वाद सामोपचाराने मिटेल. शेजारी तुमच्या बरोबर सौजन्याने वागतील. पैसा गरज भागवील. पण बचतीची इच्छा राहू पुरी होऊ देणार नाही. कोणताही जुना आजार कमी होईल. नोकरीधंद्याची स्थिती सुधारण्याच्या मार्गावर राहील. वृद्ध स्त्रियांना सुख व स्वास्थ्य लाभेल. शुभराशी ३–४–६.

**मकर : नवे संबंध**

या वेळेच्या आठवड्याची सत्तासूत्रे मंगळ व प्रामुख्याने गुरुकडेच आहेत. गुरुचे सध्याचे स्थान तर असे आहे की तुमच्या व्यक्तीमत्त्वाचा, कर्तृत्वाचा प्रभाव दूरवर टाकण्याचे सामर्थ्य त्याच्यापाशी आहे. मित्र वा नातेवाईक यांच्यात गेले काही दिवस निर्माण झालेला तणाव व दुरावा मिटण्याच्या दृष्टीपथात येईल. नातेवाईकांच्या मनातील संशयदेखील विरत जाईल. महत्त्वाकांक्षा साफल्याची नवीनवी क्षेत्रे उपलब्ध होतील. रविवार उद्योग व्यापारात काही तरी नवे घडेल. नवे पर्व सुरू होईल. सोमवार ते गुरुवार नोकरीच्या दृष्टीने योग्य पावले टाकता येतील. बेकार व्यक्तींना आशेचे किरण दिसतील. वृद्ध स्त्री-पुरुषांना त्यांच्या मुलांकडून सुख मिळेल. महिलांचा त्रास कमी होईल. नोकरीत कर्तबगारीला संधी मिळेल. शुभराशी. ७–१०–११

**कुंभ : कौटुंबिक उत्कर्ष**


ध्येयवाद व राजकीय धर्म यांचे मिश्रण चमत्कारिकपणे झालेले आहे. राजकारणात गेल्या वर्षभरात तुमचे नाव महत्त्वाचे ठरले. वरिष्ठ पातळीवर काही चर्चा वाटाघाटी देखील झाल्या. परंतु प्रत्यक्षात तुमच्या हाती न पडलेला लाभ यावेळी पडणार आहे. तुम्ही तुमचे बौद्धिक कौशल्य पणाला लावा व फायदा उठवा. प्रामुख्याने हा आठवडा तुमचा पैसा वाढवणारा, आर्थिक उन्नती करणारा आहे. तुम्ही रेसचे शौकीन असाल तर रेस खेळा. लॉटरीचे तिकीट तर अवश्य घ्या. हाती भरपूर काही पडावे. चणचण दूर व्हावी. रविवारी व्यापारी क्षेत्रात नवा मार्ग दिसेल. सोमवार ते बुधवार नोकरीच्या दृष्टीने महत्त्वाचा काळ आहे. तरुणींनी प्रेमापासून दूर रहावे. महिलांनी नोकरी धरावी. शुभराशी–७–८१२

**मीन : सारे सुरळीत घडेल**

रवी महाराज तेवढे अनुकूल नाहीत. पण रवी हा राजकीय धर्माचा ग्रह आहे हे लक्षात घेऊन आपण सध्या तरी राजकारणाच्या क्षेत्रात नवे पाऊल उचलू नये असे मला वाटते. पण इतर सर्व बाबतीत अनुकूल परिस्थिती रहाणार आहे. तुम्ही परदेश प्रवासाला उत्सुक आहात व बरेच दिवस तुमचे प्रयत्न अयशस्वी होत आहेत. पण यावेळी यशश्री तुमच्या गळ्यात माळ घालणार आहे. धर्मश्रद्धेवर तुमचे मन जडणार आहे. उपासना मार्गाचा तुम्हाला होणारा मोह टाळता येणार नाही. व्यक्तीमत्व आकर्षक बनणार आहे. कर्मठ अशा विद्वान व्यक्तीचा तुम्हाला आशीर्वाद मिळणार आहे. सोमवारी नोकरीतील तुमचे स्थान पक्के होणार आहे. बुधवार ते शुक्रवार पैसा मिळून स्वास्थ्य मिळेल. महिलांचे अनेक मनोरथ पुरे होतील. शुभराशी–१–६–९

☐ ☐



# महानिर्वाण

## पण महापुरुषाचे नव्हे !

पुष्पा भावे

राम गणेश गडकऱ्यांचे 'मूकनायक' नामे प्रहसन तुम्हाला आठवते का ? तुमच्या माझ्या दुर्दैवाने आपण 'वाळकरामा'चे प्रहसन म्हणून ते वाचतो, शोकात्म नाट्यकृती निर्माण करणाऱ्या एका कविमनाच्या नाटककाराने लिहिलेले नाटक म्हणून वाचीत नाही. जर मराठीतील पहिला प्रति–नायक (anti–hero) शोधायचा झाला तर माझ्या डोळ्यासमोर गडकऱ्यांचा 'मूक'नायकच येतो. रंग, रूप, आकार नसलेल्या सामान्य जिवाची शोकात्मिका काव्यरूपात, उत्तुंगरूपात कशी व्यक्त होणार ? त्याचे दुःखसुद्धा बिचारे त्याच्यासारखे मूक ! या दुःखाचे फक्त हसे होऊ शकते. आजच्या काळात भीषण शोकात्मिका निर्माण होऊच शकत नाही असे म्हटले जाते. पण खरं म्हणजे आजची सुखात्मिकाच दुसऱ्या टोकाने तिथे जाऊन पोहोचली आहे. जिला आपण 'Black Comedy' वा 'Dark Comedy' असे म्हणतो ती वस्तुतः समकालीन शोकात्मिकाच आहे. किंबहुना शोकात्मिकेपेक्षा कडवट आहे. आयनेस्को–बेकेट यांच्या नाटकातील Music hall शैलीचा वापर वा अप्रमाणित विनोदाचा वापर म्हणजे 'अति झालं आणि हसू आलं' या स्वरुपाचाच आहे. परंपरा, धर्म, दैवत, नातेगोते ही सर्व मूल्यव्यवस्था ढासळण्याचा अनुभव व्यक्त करीत असताना मानवी दुःख, मृत्यू यांचे पावित्र्य रहाणार कसे ? किंबहुना आज नाटककार जेव्हा प्रेक्षकांना डिवचून त्यांच्यातील पाखंड जागे करतो, त्या वेळी तो आपल्या नाट्याविष्काराला प्रस्तुत असा प्रेक्षक सहभाग निर्माण करीत असतो. या नाटककाराने निर्माण केलेल्या या नव्या, ताज्या मुक्त वातावरणात आपण स्वतःला झोकून देतो आणि अचानक ज्या विरूप सत्याला सामोरे जाणे आपण नाकारीत असतो तेच सत्य आपल्यावर येऊन आदळते. घुसमटवून टाकणारा अनुभव अपरिहार्य ठरतो. त्या नंतरचे आपले हास्य उन्मादावस्थेतीलही (Hysterical) असू शकते.

सतीश आळेकर यांचे 'महानिर्वाण' हे नाटक मला अशा स्वरुपाचा अनुभव देऊन गेले. या स्वरुपाच्या नाटकाविषयी लिहिताना 'मला' हे प्रथमपुरुषी सर्वनाम केवळ लकब म्हणून वापरले जात नाही–तो एक अडचण आहे. समजा, उद्या स्वतः नाटककार असे म्हणाला की मला अमुकतमुक अभिप्रेत नव्हते तर–तरी माझ्या नाट्यानुभवाच्या संदर्भात प्रस्तुत विवेचन सत्यच आहे असे मी म्हणेन.

दोन अंकी 'आरण्यान महानिर्वाण' हे प्रथम अंकात स्व–कीर्तन आहे तर दुसऱ्या अंकात त्यास पूर्वजकीर्तनाचे स्वरूप प्राप्त होते. 'महानिर्वाण'चा प्रारंभ होतो तो 'अंत पाहतोय' या जाणीवेतूनच ! स्वतःच्या मृत देहापासून अलग होऊन बोलणारा आवाज आपण ऐकतो. 'मला ना...एक रस्ता दिसतोय. पावसामुळे...खूप पाऊस पडलाय म्हणजे बहुधा चेरापुंजीचा रस्ता दिसतोय. खूप शेवाळ माजलंय...हिरवंगार शेवाळ. माझा पाय शेवाळ्यावरून सारखा घसरतोय.' मृत्यूनंतर हे मन भरारत स्वर्गात जात नाही–ते मृत्यूनंतरच्या अवस्थेचे सांस्कृतिक संचितातून येणारे वर्णनही करीत नाही. या मृत पुरुषाच्या मनोवस्थेचा खरेपणा पटतो तो इथेच ! पण या हळुवार मनोवस्थेला छेद देणारे चाळकऱ्यांचे–शेरेही येतात–हळूहळू अनुभव आकारत जातो. 'म्हणून तुझ्या स्पर्शाने माझे मलाच सुतक लागणार, तेव्हा जरा जपून' भाऊराव आणि रमा या नात्याचे नेमके स्वरूप इथे जाणवायला लागते. मळवट भरलेल्या–हातातले सफरचंद खाणाऱ्या रमेच्या रूपात तर स्त्रीच्या आदिरूपाचे पाश्चात्य–पौर्वात्य रूप एक स्वरूप होते.

'बरेच दिवसात आमच्या चाळीत मृत्यू नाही. म्हणून माझ्या मृत्यूची वार्ता ऐकताच तापल्या शिवारात पावसाची सर यावी तसे झाले. आनंदीआनंद झाला. भाऊराव गेला. सामान्याच्या मृत्यूचे महानिर्वाण झाले.' या सामान्याच्या शोभायात्रेची संगीत तयारी चालू होते–नानाची भविष्यसूत्राची वाट पहाणे चालूच आहे. नाना येतो तो त्या मृत्युच्या वार्तेशी–सांत्वनाच्या झिजलेल्या शब्दांशी आटयापाटया खेळतच ! तो आईशी बोलतो तो एखाद्या रखडलेल्या कामाविषयी बोलावे तसे. शोभायात्रा स्मशानाच्या दारापाशी येते आणि हे स्मशान बंद झाल्याची नोटीस दिसते. सारी गर्दी पांगते. उरतात फक्त मृत बाप...ज्याचा देह क्षणाक्षणाला जड होतो आहे आणि मुलगा ज्याच्यापुढे उद्या 'आ' वासून उभा आहे. इथे पहिला अंक संपतो. दुसऱ्या अंकाचे कथन प्रेक्षकांच्या साक्षीने भाऊरावांकडून नानाकडे सोपवले जाते. भाऊराव माळ्यावरील अडगळीत जातात. दुसरा अंक आपण नानाच्या नजरेतून पाहतो. आता कीर्तनाचा बाज मागे पडला आहे. आता मराठी–हिंदी चित्रपटातील गाण्याच्या सहकल्पना, बालपुस्तकमालेतील संवादांचे गीतांचे सूर ऐकू येऊ लागतात. मरणोत्तर संस्कारांच्या विडंबनातून हे नाटक हळूहळू एका वेगळ्याच भीषण सूत्राकडे वळू लागते. दुःखी' रमेच्या नजरेसमोर भाऊ असताना असलेल्या रिकाम्या चौकटीत काळा चष्मा आणि सूट येतो–त्याची ओळख ? डावीकडून तिसरा ! नवरा मृत–मुलगा चिकचिक झालेला–वृत्तीने दूरस्थ–चौकटीतली पुरुष प्रतिमा व्यक्तिमत्वहिन काळा चष्मा–सूट या स्वरुपाची–ती दिसली कधी भाऊरावांच्या ताटीला खांदा देताना ! एक मृत्यू एकाच वेळी इतका केविलवाणा आणि इतका भीषण असू शकतो ? अजून भाऊरावांच्या देहाला अग्नी मिळालेला नाही.

'Bury the dead'सारख्या नाट्यकृतीत चार योद्धे दफन नाकारतात. पण हे नाकारणे त्यांचे आहे, कारण ते नायक आहेत. महानिर्वाणातील भाऊरावांना नगरपालिकेने प्रवेश नाकारला आहे. माळ्यावरच्या अडगळी स्वतःच्या देहाचा असह्य होणारा वास सहन करीत ते घरातच परके होऊन वावरताहेत. शरीर इतके विघटन पावते आहे की मुंग्या दिसल्या म्हणून बोट पडलेले सापडू शकते. कालक्रम उलटा झाला आहे. आधी सदेह पिंडाला शिवून नंतर अग्नी लाभतो. काळ्याबाजाराने मिळालेल्या स्मशानप्रवेशातही मनसोक्त जळण्याची चोरी. कारण नळ जाण्यापूर्वी मुलाला आंघोळीला घरी जायचे आहे.

असा हा विलक्षण अनुभव आळेकरांनी स्वतः दिग्दर्शित केलेल्या 'महानिर्वाण' या नाटकात सादर केला. त्या नाट्यप्रयोगाविषयी, प्रेक्षकप्रतिक्रियांविषयी पुढील अंकी–

[ अपूर्ण ]





विठ्ठल

# कोल्हापूरचे ‘ सोंगी भजन ’


गतवर्षी नाट्यशिबिराच्या निमित्ताने कोल्हापूरला गेलो. दिवसभर तत्त्वचर्चा-प्रात्यक्षिके यांनी थकल्यावर सहज कोल्हापूरकरांना म्हटले–‘ आल्यासारखा खास कोल्हापुरी तमाशा तर दाखवा ’ या प्रश्नाला ‘ पु.ल ’च्या ‘ वाऱ्यावरची वरात ’ पद्धतीचेच उत्तर मिळाले–‘ मुंबई. ’ पण इतक्यात कोणीतरी म्हणाले ‘ हो–पण आमच्या विठ्ठलचे सोंगी भजन पहाणार असाल तर–’ ‘ अरे... जरूर जरूर...हा प्रकार तर कधी ऐकलासुद्धा नाही. ’ त्या साऱ्या कार्यकर्त्यांची विठ्ठल आणि माजगावकरांना शोधायची धावपळ सुरू झाली. एका रात्री व्याख्यान संपतासंपता सापडले–सापडले बातमी आली. तिथल्या तिथेच तोंड फिरवून आम्ही बसलो आणि ‘ सोंगी भजना ’ला प्रारंभ झाला. भजन सुरू होताहोताच रस्त्याकडच्या दारातून एक विस्कटलेले ध्यान आत आलं. सारे शुक् शुक् करून त्याला बाहेर काढू लागले–लुळ्यालोळत्या जिभेने तो पुन्हापुन्हा ‘ भजन बंद करा ’ असे सांगत होता. हे एस्. विठ्ठलचे पहिले दर्शन ! दारुड्याची नक्कल आपण शाळाकॉलेजातील ‘ Fancy-dress ’ स्पर्धेपासून हिंदी चित्रपटापर्यंत अनेक पाहिलेल्या असतात. तरी इथे प्रथमतः दारुड्या भेटतो. तत्त्व चर्चेच्या चिमटीत न पकडता येणारा नक्कल आणि अभिनय यातील फरक प्रत्ययास येतो. अर्थविहीन–तर्कदुष्ट विनोदाचे प्रत्यंतर या माणसांनी स्वतःच रचलेल्या संवादातून येत जाते. उनोक्ती–ती फेकण्याची विठ्ठलची धर्ती–विठ्ठल आणि माजगावकर यांची जोडगोळी, विठ्ठलच्या गळ्यातले पत्र्याचे वाद्य–त्यावर गोंधळ्याच्या आसुडाचे बसणारे फटकारे आणि स्वतःचे खळाळणारे–पुन्हा पुन्हा फुटणारे हसू बस्स इतकंच कळत राहातं. भजन संपते तेव्हा रात्र चढलेली असते, तोंडावरचा नाममात्र रंग पुसून, विठ्ठल माजगावकर जोडगोळी समोर येते. ‘ आमचा व्यवसाय वेगळा बरं का–हा व्हॉयलिन करतो आणि मी तिजोऱ्या. पण गेली वीस वर्षे हा खेळ करतोय ’, मुंबईला या हो तुम्ही ’ ‘ हां मागे मोठमोठ्या लोकांनी नेलं–पण हाल झाले...पळून आलो. ’ ते दोघे देवल क्लबच्या पायऱ्या उतरून रस्त्यावर जातात. विठ्ठलची हात मागे बांधलेली मूर्ती प्रथम पाहिली तशी वेंधळी वाटत नाही. त्या फिक्या डोळ्यातला लुकलुकणारा बेरकीपणा जाणवलेला असतो. मग आम्ही सारे विजू शिंदेच्या गळ्यात बांधतो–‘ सोंगी भजन ’ मुंबईला आणायचं ! आणि खरंच परवा ‘ अनिकेत ’ संस्थेतर्फे माटुंगा–ग्रँटरोडला चार प्रयोग झाले. सारे नवेजुने नाटकी अगदी वेडावून वेडावून हंसत होते. प्रत्येकवेळी त्या दारिद्र्यातून निर्माण झालेल्या, विकलतेची चेष्टा करणाऱ्या विनोदाने दचकत होते. अनेकतर पहिल्या प्रयोगाला आले ते परत गेलेच नाहीत. मग चारदोन दिवस ‘ देवा तो का बरं येईना ’ ‘ अलीकडे मला मार सोसत नाही ’ ‘ साऱ्या पट्ट्या आपल्याच ना–मग लाव की सगळ्या ’ अशी साधीसुधी वाक्ये एकमेकाकडे फेकून खुसखुसत होते.

दादू इंदुरीकर, दादा कोंडके आपल्या नाट्यगृहात येतात म्हणून आपल्याला सापडतात पण ‘ सोंगी भजना ’साठी कोल्हापुरास जायला हरकत नाही. समकालीन घटनांचा संदर्भ न घेता केवळ घटनात्मक विसंगतीतून फुलत जाणारा हा विनोद अनुभवताना–खऱ्या अर्थाने आजच्या नाटकाचे अशा लोकनाट्याशी असलेले नाते जाणवते. हे जाणवणे आज folk ची फॅशन आहे म्हणून येत नाही, विठ्ठल वा माजगावकरांसारखी माणसे असा ताजा अवघड अनुभव देऊन जातात.

# क्रीडांगण

पुणे जिल्हा कबड्डी असो.च्या वतीने गेल्या सप्ताहात सुरू झालेल्या तिरोडकर करंडकाच्या पाचव्या अखिल भारतीय कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन माजी मंत्री ह.गो. उर्फ भाऊसाहेब वर्तक यांच्या हस्ते झाले.
ही स्पर्धा यावर्षी प्रथमच आपल्या स्वतःच्या स्टेडियममध्ये सुरू झाली. योगायोग असा की मुंबई क्रिकेट असो.ला कसोटी सामने आपल्या स्वतःच्या वानखेडे स्टेडियमवर ज्या वर्षी घेता आले त्याच वर्षी कबड्डी सामनेही स्वतःच्या स्टेडियमवर भरत आहेत. पण फरक असा की
या स्टेडियमला स्वतःचे नांव देण्याचा प्रयत्न भाऊसाहेबांनी केला नाही.



मानवंदनेचा स्वीकार

पकडीची तयारी



आणि
एक सुरेख पकड







# कोंडीत सापडलेला लघुउद्योग

प्रत्यक्ष मुलाखतींच्या आधारे तयार केलेला सविस्तर लेख

**माणूस पुढील अंकी**

## दामखिड चळवळ कोठे जाणार ?: मुखपृष्ठ २ वरून

यांत्रिकीकरण करण्यात येते. 'उत्पादनवाढी'साठी नफा ही मध्यवर्ती प्रेरणा असते. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवावे लागते. त्यामुळे खेडेगावात एका शेतकऱ्याकडे पुरेसे भांडवल नसल्यास, थोडे थोडे भांडवल असलेले अनेक शेतकरी एकत्र आल्यास हे शक्य बनते. आपल्या देशातील विशेषतः महाराष्ट्रातील 'सहकारी सोसायट्यांची चळवळ' हे याचे सहज समजेल असे उदाहरण. या चळवळीत पुढे काही ठराविक लोक या सोसायट्यांच्या संपूर्ण कारभारावर आपला जम बसवून जास्तीत जास्त नफा उकळू लागले व इतर अधिकाधिक दुबळे बनले. त्यामुळे खेड्यात श्रीमंत शेतकरी व भूमीहीन शेतमजूर या सारखे भांडवलशाही चौकटीतील नवे वर्ग निर्माण झाले. जे तेथे पूर्वी अस्तित्वात नव्हते.

या (दामखिड) चळवळीच्या संदर्भात दोन प्रमुख गोष्टी ठळकपणे दिसतात. १ : चळवळीस 'सामाजिक जाणीव' अजिबात नाही. २ : बाहेरच्या जगात आज भांडवलदारी उत्पादनसंबंध अस्तित्वात आहेत. त्यामुळे तेथील कार्यकर्त्यांची स्वतःच्या कामावर कितीही निष्ठा असली तरी वर उल्लेख केलेल्या 'सहकारी सोसायट्यांच्या चळवळी'प्रमाणे याही चळवळीचा शेवट खेड्यात नवे भांडवलशाहीच्या चौकटीतील उत्पादनसंबंध निर्माण करण्यात होण्याची शक्यता वाटते.

५. तेथे वर्ग संघर्ष नाही म्हणजे जमिनदार वा श्रीमंत शेतकरी आणि शेतमजूर असे वर्ग ठळकपणे दिसत नाहीत एवढेच आबांना म्हणायचे आहे. पण त्यांच्या निष्ठायुक्त कामामुळे असे वर्ग निर्माण होण्यास मदतच होईल असे वाटते. वर्गलढ्याशिवाय भारतापुढील समस्या सुटणार नाहीत असे मलाही वाटते.

६. 'शोषण' हा शब्द मार्क्सवादी विशिष्ट अर्थाने वापरतात. सर्वोदयी व समाजवादी मंडळींच्या डोळ्यासमोर त्याचे स्पष्ट चित्र नसते असे वाटते. म्हणूनच त्यांनी ते स्पष्ट करायला हवे.

७. चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना जाहीर प्रश्न.

१ : उत्पादनसंबंध बदलू इच्छिणाऱ्या इतर भागातील चळवळीशी या चळवळीची सांगड कशी घालता येईल ?

२ : 'समाजवाद' म्हणजे 'खासगी मालकी'चा संपूर्ण नायनाट. अशा प्रकारची 'समाजवादी क्रांती' (खासगी मालकी नष्ट करणारी व सामाजिक जाणीव देणारी) तुम्हाला करावयाची आहे की नाही ?

३ : 'समाजवादी क्रांती' हवी असल्यास या चळवळीस 'समाजवादी जाणीव' कशी देता येईल ?

४ : स्थानिक लोकांना केवळ दोनवेळचे खाणे व पुरेसे कपडे मिळताच चळवळीचा हेतू साध्य झाला, आपले काम संपले असे मानता का ?

अशा प्रश्नांची उत्तरे दिल्याखेरीज चळवळीच्या सहानुभूतीदारांना चळवळीविषयी निश्चित भूमिका कशी बरे घेता येईल ? नाहीतर तरुणांनी चालविलेली दिशाहीन, भविष्याचा वेध नसलेली चळवळ हेच तिचे स्वरूप राहील.

**ए. के. डब्ल्यू. मुंबई**

---

# साप्ताहिक माणूस

**मालकी व तत्संबंधित इतर तपशिलाचे निवेदन**

**( अधिनियम ४, नियम ८ अन्वये )**

| | |
|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : पुणे |
| २. प्रकाशन काल | : साप्ताहिक |
| ३. मुद्रक, प्रकाशक, संपादक नाव व पत्ता | : श्री. ग. माजगावकर<br>१०२५, सदाशिव, पुणे ३० |
| ४. नागरिकत्व | : भारतीय |
| ५. प्रकाशन संस्थेचे नाव व तिच्या भागीदारांची नांवे व पत्ते | : राजहंस प्रकाशन<br>१. ब. मो. पुरंदरे<br>१०२५, सदाशिव, पुणे ३०<br>२. श्री. ग. माजगावकर<br>१०२५, सदाशिव, पुणे ३० |

वर दिलेला तपशील बरोबर आहे.

प्रकाशकाची सही

दिनांक : ८ मार्च, १९७५ श्री. ग. माजगावकर






राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सादशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**